नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी ७

मनोहर देशपांडे
मधुकर रघुनाथ आष्टीकर
तुळशीराम काजे
मधुकर केचे
द. चिं. सोमण
दत्तात्रेय कुळकर्णी
बाबा मोहोड
विश्वास
राम डोके
भ. प्र. मोहरीर
सदाशिवराव काकडे
सुरेश डोळके

या शिवाय

ग्रंथसमालोचन, संघवार्ता
इत्यादि

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

विदर्भ साहित्य संघ
विदर्भविषयः सारस्वती जन्मभूः

आक्टोबर १९५२

किंमत आठ आ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक–पुरुषोत्तम दिवाकर दवळे

वर्ष ८ वें] आक्टोबर १९५३ [अंक ७ वा

अनुक्रमणिका

लेख	लेखक	पृष्ठ
१ संपादकीय		१
मनःपूर्वक अभिनंदन		
सभासद वाढवा		
राजभाषा अधिनियम		
कै. कविवर्य अण्णाजी बोवडे		
कै. बुवा उपाध्ये		
दिवंगत पं. बाळकृष्णशास्त्री महानुभाव		
कै. बी. रघुनाथ		
२ प्रवाह (लघुकथा)	—श्री. मनोहर देशपांडे	४
३ ध्वनितत्त्वाचा प्रथम पुरस्कर्ता 'भामह'	—प्रा मधुकर रघुनाथ आप्टोकर	७
४ कांही कविता	...	९
पलीकडे जें शब्दाच्या	—श्री. तुळशीराम काजे	
जग सारें झोपलेलें	—श्री. मधुकर केचे	
देव बोलला	—श्री. द. चिं. सोमण	
मनाच्यां भंगल्या मशीदीवर	—श्री. दत्तात्रेय कुळकर्णी	
पायवाट	—श्री. बाबा मोहोड	
फुलांत हसतें	—श्री. विश्वास	
५ पंख (लघुकथा)	—श्री. राम डोके	१३
६ कवितेची नवी प्रक्रिया	—श्री. भ. प्र. मोहरीर	१७
७ वाकाटकांच्या राजधानीचीं शहरें	—श्री. सदाशिवराव काकडे	२०
८ अहंकार (गद्यकाव्य)	—श्री. सुरेश डोळके	२२
९ ग्रंथसमालोचन	—श्री. मा. गो देशमुख, श्री. के. के., श्री. ना. रा. शेंडे, श्री. गो. रा. दो. इत्यादि	२३
१० प्यारी कुरूपता (गद्यगीत)	—'सुमतिदास'	२८
११ परीक्षाफल		२९
१२ संघवार्ता		३१

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

यु ग वा णी

वर्ष ८ वें आक्टोबर १९५२ अंक ७ वा

सं पा द की य

मनःपूर्वक अभिनंदन

'सर परशुरामभाऊ कॉलेज', पुणें या संस्थेची 'कौशिक व्याख्यानमाला' गुंफण्याचा स्पृहणीय मान, यंदाचे वर्षी विदर्भ साहित्य संघाचे गतवर्षाचे अध्यक्ष **डॉ. शं. वा. दांडेकर** यांना मिळाला होता. ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाची पार्श्वभूमि व आयोजन; ज्ञानेश्वरांच्या भागवतधर्माचें व अध्यात्माचें स्वरूप; सिद्धान्त आणि वेदान्त; आणि ज्ञानेश्वरांचें काव्य आणि व्यवहार-निरूपण; अशीं चार व्याख्यानें त्यांनी दिलीं. प्रा. न. र. फाटक, डॉ. तुळपुळे, डॉ. वि. भि. कोलते, इत्यादि लेखकांच्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांतील ज्ञानेश्वर-विषयक विचारांची चिकित्सा करून त्यांनी आपल्या विषयाचें प्रतिपादन वरील व्याख्यानांत केलें. हीं त्यांचीं व्याख्यानें प्रकाशनद्वारा जनतेस लवकर वाचावयास मिळोत व ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचा आनंद सर्वांना लाभो !

× ×

आपल्याकडील विद्वान् व सुप्रसिद्ध साहित्यिक, विदर्भ साहित्य संघाचे एक पूर्वाध्यक्ष व प्रमुख कार्यकर्ते आणि नागपूर महाविद्यालयांतील मराठीचे माजी प्राध्यापक **श्रीयुत श्री. ना. ऊर्फ दादासाहेब बनहट्टी** यांची 'भारतीय नभोवाणी'वर मराठी भाषेचे सल्लागार म्हणून नेमणूक झाली आहे. मराठी भाषेच्या क्षेत्रांत येणाऱ्या मुंबई, पुणें व नागपूर या तीन केंद्रांसाठी 'सल्लागार' म्हणून ते काम करतील; सध्या त्यांचें मुख्य कार्यालय पुणें येथे राहील.

प्रा. बनहट्टी यांची साहित्यसेवा, विद्वत्ता व व्यासंग यांची मराठी भाषिकांना चांगलीच ओळख आहे. तसेंच निरनिराळ्या शिक्षणविषयक व साहित्य-विषयक संस्थांचें संचालकत्व त्यांनी केल्याने त्यांची सार्वजनिक कामगिरी जनतेला सुपरिचित आहे. मराठी भाषेविषयी त्यांना वाटणाऱ्या अपूर्व जिव्हाळ्याची त्यांनी लिहिलेले ग्रंथ व लेख साक्ष देतील. नभोवाणी-सारखें प्रभावी साधन व प्रा. बनहट्टींचा 'मऱ्हाठा' अभिमान, या दोहोंचा संगम मराठी भाषेच्या प्रतिष्ठेस व उत्कर्षास कारण होवो !

*

सभासद वाढवा

विदर्भ साहित्य संघाचे मताधिकारयोग्य सभासद होण्याची चालू वर्षाची मुदत १५ आक्टोबरपर्यंत आहे. या अवधींत जुन्या वर्गणीदारांनी आपली वर्गणी भरून व इतरहि साहित्यप्रेमी मंडळींना सभासद करून संघाचे सभासद वाढविण्यास हातभार लावावा. संघाचे सभासद वाढविण्याबद्दल गेल्या जुलैच्या अंकांतील संपादकीय स्फुट लेखामुळे कांही वाचकांचा गैरसमज झाला होता. त्याचें निराकरण एव्हाना झालेंच असेल. युगवाणीचा खर्च व सभासदत्वाची वर्गणी यांचा मेळ बसण्याच्या दृष्टीनेहि सभासद–संख्या हल्लीच्या दुप्पटीहून अधिक झाली, तर तें साह्यभूतच होणारें आहे. संघाने हातीं घेतलेलीं कामें व संकल्पित कार्य हें मराठी भाषेची प्रतिष्ठा वाढविणारें व अभिवृद्धि करणारें आहे हें ओळखून या राज्यांतील प्रत्येक मराठी भाषिक संघाचा सभासद होण्यास आत्मीयतेनें पुढे येईल, अशी आम्ही उमेद बाळगतों.

*

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजभाषा अधिनियम

राजभाषा अधिनियमाचें विधेयक गेल्या ता. २ सप्टेंबरपासून राज्यांत अमलांत आलें आहे. या विधेयकासंबंधी संघाची भूमिका अत्यंत स्पष्ट करण्यांत आलेलीच आहे. सध्याच्या विधेयकाने मराठी व हिंदी या उभय भाषांना समान दर्जा दिलेला असला, तरी व्यवहारांत शासनाकडून मराठीची आबाळ होण्याची भीति सर्वत्र साधार व्यक्त केली जात आहे. या बाबतींत 'बुलढाणें' बार असोसिएशनने दि. १०-९-५३ रोजीं केलेल्या ठरावाकडे आम्ही सरकारचें लक्ष वेधूं इच्छितों. त्याचप्रमाणें प्रकाशन खात्याकडून प्रेसनोट्स, वृत्त वगैरे जी माहिती पुरविली जाते त्यांतहि हिंदीला प्राधान्य मिळून हिंदी भाषेंतील पत्रकें मराठीच्या अगोदर पुरविलीं जातात, असें दिसून आलें आहे. अशा प्रकारें मराठीवर आक्रमण व तिला दुय्यम दर्जा देण्याचे जे प्रकार एवढ्यांतच सुरू झाले आहेत, त्यांकडे आम्ही सरकारचें व विशेषतः मुख्य मंत्री पं. रविशंकर शुक्ल यांचें लक्ष वेधूं इच्छितों व हे प्रकार ताबडतोब बंद करावेत, अशी मागणी करतों.

या बाबतींत मराठी विभागांतूनच जे लोकप्रतिनिधि असेंब्लींत निवडून गेले आहेत त्यांच्यावर मराठी भागांत हिंदीवर आक्रमण होणार नाही हें पाहण्याची विशेष जबाबदारी आहे, हें उघडच आहे. त्याचप्रमाणें या भागांतील मंत्र्यांनीहि फाइलींवर मराठींतूनच शेरे लिहिले पाहिजेत. भाषिक प्रांतरचनेच्या बाबतींत महाविदर्भ की संयुक्त महाराष्ट्र याबद्दल कोणाची कांहीहि मतें असलीं, तरी त्यांनी मराठी भाषेचें समान स्थान व प्रतिष्ठा राखण्यासाठी सरकारी फाइलींवर मराठींतूनच लिहिलें पाहिजे. किंबहुना ही त्यांच्या याबाबदच्या निष्ठेची आणि जनमताला मान देण्याच्या प्रवृत्तीची कसोटीच ठरणार आहे, असें म्हणणेंहि चूक होणार नाही.

✳

कै. कविवर्य अण्णाजी बोबडे

अलीकडील काळांतील उच्च दर्जाचा आत्मतुष्ट व अंतर्मुख वृत्तीचा कवि म्हणून जर कोणाचा यथार्थतेने उल्लेख करावयाचा झाला तर तो **कै. श्रीनिवास रामचंद्र उर्फ अण्णाजी बोबडे** यांचा करतां येईल.

कशास कवि हें अभिधान ।
कशास कविचा सन्मान ।।.....
माझें गाणें मजकरितां ।
कशास निंदा स्तुति चिंता ।।

अशाच वृत्तीने त्यांनी आपली सर्व काव्यरचना केली. त्यांच्या हयातींत जरी त्यांच्या कांही फुटकळ कविता प्रसिद्ध झाल्या असल्या, तरी त्यांचा कवितासंग्रह त्यांच्या नंतरच प्रसिद्ध झाला, याचेंहि हेंच कारण होय. शब्दांची निवड करण्यांत अत्यंत चोखंदळपणा त्यांनी दाखविला आहे; संस्कृत साहित्य व काव्य यांचा गाढ व्यासंग त्यांच्या काव्यांत उतरलेला दिसून येतो; शृंगार, करुण, वीर, हास्य आणि भक्ति हे त्यांच्या कवितेचे रसविषय आहेत. पण त्यांच्या काव्यांतल्या प्रसाद आणि माधुर्य या गुणांनीच वाचक अधिक आकृष्ट होतो. 'राष्ट्रीय' कवितांचा तो काळ असूनहि त्यांनी 'राष्ट्रीय' कविता फारशा केलेल्या नाहीत. ज्या केल्या आहेत त्यांतील ओज प्रभावी आहे.

"लोपलें शौर्य वीरांचें । पोवाडे गावे कोणाचे ।। "

असें म्हणत असतांच त्यांनी

"गेली ज्योत विझोनिया तरि पुन्हा पेटेल ती आंतुनी"

असा आत्मविश्वासहि व्यक्त केला आहे; आणि

"होतां प्रजेस सुख देइल ती सुखाला
नाही तरी गहनं कर्मगति नृपाला "

असा इशाराहि राज्यकर्त्यांना दिला आहे.

बोबडे यांचें १०१ श्लोकांचें शृंगारसंगीत हें त्यांचें एक छोटेसें खंडकाव्यच आहे. आणि त्याचा वर्ण्यविषय विप्रलम्भ शृंगार हा नसून संभोग-शृंगार आहे. त्यांचें हें काव्य जेवढें चटकदार आहे, तेवढेंच त्यांनी "अरे आला कवी आता......" वगैरे जे कविसंबंधी काव्य केलें आहे, तें हृद्य आहे. त्यांची काव्यरचना अत्यंत मोहक आहे. ती किती मोहक आहे हें त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें झालें तर असें म्हणतां येईल:—

सोपान जेंव्हा चढते विलासिनी ।
आमंद ये मंजिर रंजित ध्वनी ।
सालंकृता भासत गात शारदा ।
वीणेवरी मंजुळ काव्यसंपदा ।।

✳

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. बुवा उपाध्ये

श्री: जयकृष्ण केशव उर्फ बुवा उपाध्ये यांची पुण्यतिथी नुकतीच येऊन गेली. विदर्भांतीलच नव्हे तर महाराष्ट्रांतील जुन्या पिढींतल्या नामवंत साहित्यिक व कवि यांच्यांत बुवा उपाध्ये यांची गणना होते. बुवांची स्फुट काव्यरचना पुष्कळच आहे. परंतु त्यांनी 'उमर खय्याम'च्या 'रुबायां'चें केलेलें मराठी रूपांतर हेंच एकटें सुद्धा बुवांचें मराठी साहित्यांतील स्थान आढळ करण्यास पुरेसें आहे. फारशी उमर खय्यामची आयात या मराठी भूमींत जरी माधवराव पटवर्धनांनी केली असली तरी त्याचें खरेखुरें सरस व सुरस मराठी रूपांतर मराठी रसिकांच्या हातीं देण्याची कामगिरी बुवांनीच केली यांत मुळीच संशय नाही.

आमच्या प्रांतांतील मराठी साहित्याच्या इतिहासांत बुवांचें स्थान आणखी एका दृष्टिनेहि अविस्मरणीय असें आहे. साधारणत: १९३० च्या काळांत या प्रांतांत सांस्कृतिक जागरणाची जी एक नवी लाट उसळली होती त्याला मूर्त स्वरूप देणारांपैकी श्री. बुवा उपाध्ये हे एक प्रमुख होते.

कै. अण्णाजी बोबडे, कै. वासुदेवराव फडणवीस, श्री बाळाजी हुद्दार, इत्यादि सहकाऱ्यांच्या सहाय्याने 'वागीश्वरी' मासिक व 'वागीश्वरी प्रकाशन' सुरू करून या सांस्कृतिक नवजागरणाला संघटित व प्रभावी स्वरूप देण्याचा प्रयत्न बुवांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. थोडक्याच अवकाशांत अगदी जुन्या पिढींतील कृष्णशास्त्री घुले, भाऊजी दप्तरी यांच्यासारख्या विद्वानांपासून तों अगदी राजा बढे, व्यंकटेश वकील आदि अगदी नव्या लेखकांपर्यंत या प्रांतांतील साहित्यिक व सांस्कृतिक परंपरा 'वागीश्वरी' भोवती केंद्रित झाली व जवळ जवळ पांच सहा वर्षे तें या प्रांतांतील साहित्यिक कार्याचें प्रतीक बनलें. बुवा हे विदर्भांतील थोर कवि तर होतेच परंतु वर निर्देशिलेली त्यांची कामगिरी या प्रदेशांतील साहित्याच्या अभिवृद्धीच्या दृष्टीनें फार मोठी गणली जाईल.

साहित्यक्षेत्रांत त्यांचे अनेक वारस असतांहि त्यांचें लिखाण प्रकाशांत आणून हा अमोल ठेवा रसिकांच्या हवालीं करण्याची वुद्धि कुणालाच होऊं नये हें दुर्भाग्यच म्हटलें पाहिजे.

दिवंगत पं० बाळकृष्णशास्त्री महानुभाव

'देवदेवेश्वर संस्थान.' माहूर येथील गादीवरील पट्टाभिषिक्त महंत पंडित बाळकृष्णशास्त्री महानुभाव हे दिनांक १५-९-५३ रोजीं मंगळवारीं सकाळीं दहा वाजतां, नागपूर येथील 'मेडिकल कॉलेज हॉस्पिटल' मध्ये कालवश झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेने योजलेल्या मराठीवाङ्मयाच्या 'महानुभाव खंडा'चे ते एक 'उपसंपादक' म्हणून निवडले गेले होते, यावरून शास्त्रीबुवांच्या विद्वत्तेची व खोल व्यासंगाची वाचकांना कल्पना येण्याजोगी आहे. परंपरेचें ज्ञान व आधुनिक दृष्टि यांचा उत्कृष्ट संगम बाळकृष्णशास्त्री यांच्या विद्वत्तेंत व व्यासंगांत प्रतीत होत असे. त्यांच्या शोकप्रद निधनामुळे महानुभाव समाज व पंथ याचें तर अपरिमित नुकसान झालें, तसेंच मराठी वाङ्मयाचा एक तज्ज्ञ संशोधक व ग्रंथकार नाहीसा झाला, म्हणून आम्हांला अत्यंत वाईट वाटतें. पंडित बाळकृष्णशास्त्री, यांच्या संबंधींचा डॉ. वि. भि. कोलते यांचा लेख, 'युगवाणी'च्या वाचकांना पुढील अंकीं वाचावयास मिळेल. महानुभाव समाज व शास्त्रीबुवांचे अनेक स्नेही यांच्या दु:खांत आम्ही अंशभागी आहोंत. परमेश्वर शास्त्रीबुवांचे आत्म्यास शान्ति देवो!

कै. बी. रघुनाथ

मराठवाड्यांतील नामवंत साहित्यिक बी. रघुनाथ यांच्या अकाली निधनाची वार्ता ऐकून मराठी कथेच्या व कवितेच्या वाचकांना धक्का बसला असेल यांत शंका नाही. मराठवाड्यांतील परभणीसारख्या एकाट जागीं राहून व विपरीत परिस्थितीशीं झगडून साहित्याच्या निस्सीम भक्तीने त्यांनी केलेल्या त्यांच्या कथालेखनाकडे किंवा काव्याकडे विशिष्ट वर्तुळांत गिरक्या मारणाऱ्या टीकाकारांचें विशेष लक्ष गेलें नसलें तरी मराठी कथांच्या निपःक्षपाती वाचकांच्या मनांत त्यांनी मानाचें स्थान मिळवलें यांत शंका नाही. मराठी कथावाङ्मयांतील साकी'काराची आठवण वाचक सहजासहजी विसरणार नाहीत अशी खात्री आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा

प्रवाह

लेखक : मनोहर देशपांडे

टेबलावर दोन्ही हातांच्या ओंजळींत डोकं खुपसून घेऊन सदानंद बसला होता. कोपऱ्यांत टेबल लॅम्प मंदपणें जळत होता आणि त्याच्या प्रकाशांत जें खोलीचं दृश्य दिसत होतं तें फारसं आल्हादायक नव्हतं. खोलींतील साऱ्या वस्तु मरगळलेल्या, पिकुटलेल्या अवस्थेंत पडल्या होत्या. आरसा पालथा पडला होता, कंगवा कोपऱ्यांत धुळींत माखला होता आणि टेबलावर पडलेल्या कपांत निवलेला चहा बऱ्याच वेळापासून तसाच राहिलेला दिसत होता. टेबललॅम्पच्या मंद प्रकाशांत कपांतील चहाच्या द्रवावर आलेला तवंग मोठा चमत्कारिक दिसत होता. सदानंदानं पिंजारले गेलेले केस कपाळाचे वर सावरले आणि तो टेबलावरील समोरच ठेवलेल्या एका वस्तूकडे पाहूं लागला. कसल्या तरी चमत्कारिक द्रवानं भरलेली ती एक छोटीशी काचेची कुपी होती आणि त्यावर लालभडक अक्षरांत लिहिलं होतं— विष !—

सदानंदाची दृष्टि आता एकाग्र झाली. शरिरांतलं आणि मनांतलं सारं धैर्य एकवटून त्यानं हात लांबविला. लांबविला म्हणण्यापेक्षा लांब करण्याचा प्रयत्न केला, असं म्हटलं तर तें वस्तुस्थितीला अधिक धरून होईल. कारण सदानंदाला आपला हात विलक्षण बधिर झाल्यासारखा वाटूं लागला. इतका बधिर–सभोवताली बर्फाची लादी गुंडाळून ठेवलेल्या एखाद्या रुळासारखा ! मोठी चमत्कारिक कल्पना आहे, नाही का ? पण सदानंद जसजसा बाटलीच्या दिशेनं हात लांबवूं लागला तसतसा आपल्या हाताभोवती बर्फाचा लगदा अधिकाधिक गुंडाळला जात असल्याचा त्याला भास झाला. त्यानं हात उचलण्याचा प्रयत्न केला, झाडण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! कसल्या तरी विचित्र शक्तीनं त्याचा हात अधिकच बधिर होत होता. मनाच्या साऱ्या शक्ति एकत्रित करून त्यानं हाताची हालचाल करण्याचा प्रयत्न केला. पण शरिराच्या त्या अवयवापाशी येतांच जीवनाचा प्रवाह जणू थांबत होता. चेतना जणू मृतवत् होत होती आणि बधिर, दिङ्मूढ अवस्थेंत सदानंद लडफडत होता.

घड्याळांत ठण्णकन् ठोका पडला. रात्रीचा एक वाजला होता की दीड ? कांहीच समजायला मार्ग नव्हता. काळाचा प्रवाह जणू त्या ठोक्यापाशीच थांबला होता. रात्र पूर्वार्धांत होती वा उत्तरार्धांत याचा उलगडा होत नव्हता. तिन्ही सांजेनंतर दबकत आलेली ही रात्र, की प्रकाश फुटण्याच्या आधी कोंदटलेला हा काळोख होता ? कांही कांही समजत नव्हतें.—सदानंदानं मान उचलून घड्याळाकडे पाहण्याचा प्रयत्न केला. नुकताच त्यानं तासाचा, किंवा अर्ध्यातासाचा ठोका ऐकला होता. पण आता तें घड्याळ मोठं चमत्कारिकपणें वागत होतं. तासाचे, मिनिटाचे नि सेकंदाचे सारे काटे एकमेकांभोवती फिरत होते. आणि घड्याळाच्या त्या परिघांत एक विचित्र चक्राकार वर्तुळ निर्माण झालं होतं. इतक्या वेगवान गतीनं ते सारे काटे स्वतःभोवतीच फिरत होते की, सदानंदाची त्यावर दृष्टि ठरेना. मनांतून त्याला विलक्षण भीतिहि वाटूं लागली. त्याला वाटलं मोठ्यानं ओरडावं आणि सांगावं की, 'थांबवा. थांबवा हा वेग. हा विचित्र खेळ' पण त्याची जीभ जणू टाळ्याला चिकटून बसली होती. आणि बोलण्याचा त्याचा सारा प्रयत्न असहाय; निष्फळ आणि केविलवाणा होत होता.

सदानंदानं जोरानं दात आवळले, आणि खालच्या ओठांतून रक्ताची चिळकांडी उडाली. जिभेनं ओठ टिपून तो निश्चल दृष्टीनं समोरच्या बाटलीकडे पाहूं लागला. काचेची ती कुपी आकारानं अगदी लहान होती. कुपीचं बूचहि काचेचच होतं. लालसर रंगाच्या द्रवानं ती बाटली भरलेली होती. आणि बाटलीच्या काचेच्या शरीरांतून लालसर द्रवाचा आत्मा सदानंदाकडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहून मिस्किलपणें हसत होता. सदानंदाला तें समजत होतं, पण तो अगतिक होता. त्याचीं सारीं गात्रं वधिर, संवेदनांच्या पलीकडे आणि चेतनाहीन झालीं होतीं. घड्याळांत कुठल्यातरी तासाचा ठोका पडला तेव्हाच त्याच्या मनांत झटकन संवेदना उठली होती की, हात लांब करून पट्कन् ती कुपी हातांत घ्यावी आणि—आणि...

पण ती संवेदना, इच्छाशक्तीची ती इवलीशी लहर, दुसऱ्याच क्षणीं विरली होती आणि सदानंद होता त्याच वधिर, चेतनाहीन, कळाहीन स्थितींत लोंबकळत राहिला.

सदानंदाचे डोळे आता शून्यांत लागले होते. केस विसकटले होते आणि भान हरपलें होतें. पण हें सारं केव्हा-पासून तरी घडत होतं. पुस्तकाचीं असंख्य पानं वाऱ्याच्या झोतानं एकदम फडफडून उलटलीं जावींत त्याप्रमाणें क्षणांचे नि पळांचे असंख्य कण कालांत विलीन झाले होते. आणि आता कालाची मर्यादा जणू संपली होती. त्याचा आरंभ आठवत नव्हता तसा शेवटहि सापडत नव्हता. मध्येच कुठेतरी हा कालपुरुष येऊन थांबला होता आणि गोठून, थिजून, वठून जागच्याजागीं उभा होता.

सदानंदानं डोळे वर उचलून काचेच्या कुपीकडे पाहिलं आणि त्याला विस्मयाचा धक्का बसला. बाट-लीच्या दिशेनं एक किडा सरकत सरकत येत आता अगदी जवळ आला होता. सदानंदानं क्षणभर आपला श्वास आवरून धरला आणि तो एकाग्र नजरेनं त्या किड्याकडे पाहूं लागला. हळूहळू सरकत किडा आता बाटलीवर चढूं लागला. सदानंदाच्या हृदयाचे ठोके जलद पडूं लागले. बाटलींत जहाल विष आहे एवढंसुद्धा त्या किटाणूला समजूं नये म्हणजे काय? अनिश्चय, अविचार, अगतिकता ह्यांना कुठेतरी मर्यादा असतेच असते. पण आता विश्वांतला हा क्षुद्र जीव प्राणाची आशा सोडून बाटलीच्या टोपणावर जाऊन बसला. आणि बघतां बघतां सदानंदाच्या डोळ्याची पापणी लवते न लवते तोंच तो लहानगा जीव बुचाच्या नि बाटलीच्या तोंडांतील फटीमधून जो पडला तो सरळ आंतील रक्तवर्णाच्या द्रवामध्ये.!...

सदानंद एकदम मोठ्यानं किंचाळला. तसा तो फारसा मोठ्यानं किंचाळला नव्हता. पण त्याच्या किंकाळीचा आवाज त्याच्या अंतर्मनांतून एवढ्या मोठ्यानं घुमला की, त्याची त्यालाच भीति वाटूं लागली. आपली किंकाळी ऐकून शेजारपाजारचे लोक धावून येताहेत, त्यांच्या पावलांचा नि बोलण्याचा आवाज जवळ येत येत आता अगदी दाराजवळ येऊन थांबला, असा त्याला भास झाला. आपल्या अविचारा-बद्दल शेजारी आपणाला पकडून पोलिसांत देत आहेत, जबान्या होताहेत, साक्षीपुरावे समोर येताहेत आणि सारेजण आपल्याकडे बोट दाखवून कुजबुजत आहेत. दारिद्र्यामुळे का कोणी हैराण होत नाही? बेकारीमुळे मनस्ताप होतो हें का कुणाला माहीत नाही? प्रेमभंग का कुणाचा होत नाही? आणि तरीसुद्धा सदानंदाचा घसा कोरडा पडला आणि कुणीतरी आपला गळा आवळीत आहे, असा त्याला भास होऊं लागला. आणि या सगळ्याला साक्ष म्हणजे विषानं भरलेली ती लहानशी कुपी! त्यानं त्या कुपीकडे पाहिलं आणि त्याच्या मनाचा थरकाप उडाला. कुपींतील द्रवांत पडलेला किडा जिवाच्या आशेनं तडफडत होता. सदानंदाची दृष्टि हळूहळू त्या दृश्यावर केंद्रित होऊं लागली. पण मग विलक्षण चमत्कार घडला. कुपींतील द्रव पदार्थ जणू काय नासलें दूध फसफसावें तसा फसफसूं लागला. आणि हळूहळू नदीला पूर यावा तसा तो द्रवाचा साठा वाढूं लागला. वाढतां वाढतां सबंध टेबलभर त्या विषद्रव्याचा पसारा वाढला. त्यांत पडलेला तो लहा-नसा धडपडत किडा तडफडत पृष्ठभागावर येण्याचा प्रयत्न करीत होता. पण कितीवेळ तो जीवनाची ही लढाई खेळणार, याचा अंदाज सदानंदाच्या मनाला बांधतां येईना.

मध्येच करुणेचा कणव त्याच्या मनांत उत्पन्न झाला. त्यानं हात लांब करून बाटलीला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला पण बाटलींतील द्रवाचा अनपेक्षितपणें एक लोंढा आपल्याच दिशेनं येत आहे, हें पाहतांच त्यानं हात एकदम मागे घेतला. कुपींतील द्रवाचा प्रवाह हळू हळू सदानंदाच्या दिशेनं सरकूं लागला तसा त्याचा जीव लोळा गोळा होऊन उठला. खूप जोरानं ओरडावं आणि टेबलापासून दूर दूर पळून जावं, असं त्याला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटलं. पण कसल्या तरी अदृश्य शक्तीनं जणू तो खुर्चीला खिळून बसला. शरीराची सारी हालचाल, मनाची सारी यंत्रणा जणू स्तब्ध झाली होती, थिजली होती. जवळ येतां येतां त्या प्रवाहानं आपणाला व्यापलं आहे आणि हळू हळू आपण त्या प्रवाहांत वाहत चाललों आहोंत असा क्षीण भास सदानंदाला झाला. त्याच्या शरीराचा भयंकर दाह होऊं लागला. मान उंचावून त्यानं सभोवताल पाहिलं. मघाचा तो किडा आता दूरवर कुठेतरी लुप्त झाला होता. प्रवाहाचा ओघ विलक्षण गतिमान होता आणि ठिकठिकाणीं भोवरे फिरावेत त्याप्रमाणे प्रवाहांत चक्राकार गतीनं एकमेका-भोवती वाहणारे गतिमान ओघ होते. त्यांना विलक्षण ओढ होती. या असल्या विचित्र प्रवाहांत असे कितीवेळ आपण वाहत जाणार आहोंत याची सदानंदाला कांहीच कल्पना येईना.

दृष्टि उंचावून त्यानं काठ शोधण्याचा प्रयत्न केला. दूरवर माणसांचे ठिपके दिसत होते. विराम-चिन्हांप्रमाणे दिसणाऱ्या त्या चित्र–विचित्र आकृत्यांकडे तो क्षणभर पाहतच राहिला. त्यांतला एक ठिपका हळू हळू जवळ येऊं लागला, तसा सदानंदाचा जीव भीतीनं गांगरून गेला. तो ठिपका, तो मानवी जीव त्याला कांही विशेषसा प्रिय नव्हता. पण तरी आपणाप्रमाणे त्यानंहि या प्रवाहाच्या भोवऱ्यांत सापडावं असं त्याला वाटेना. त्यानं हात वर वर करून त्याला खुणावण्याचा प्रयत्न केला. पण ती आकृति आंधळेपणानं जवळ जवळ येतच होती. सदानंदाच्या अगदी जवळ ती आली आणि स्तब्ध उभी राहिली. सदानंदानं त्या आकृतीच्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि त्याला आश्चर्याचा धक्का बसला. ते त्याचे काका होते. त्याच्या वडिलांचे सहाहजार रुपये पचवून सदानंदाला वावडीसारखा भिरभिरत मोकळ्या जगांत सोडल्यानंतर त्याची त्यांच्याशीं होणारी ही भेट मोठी चमत्कारिक होती. सदानंदाच्या चुलत्याच्या चेहऱ्यावर केविलवाणा आणि दीनवाणा भाव इतका विलक्षण दिसत होता की, त्याहि परिस्थितींत सदानंदाला त्यांच्या विषयी एकदम करुणा वाटूं लागली. त्यानं हात लांबवून त्यांच्या शरीराला स्पर्श करायचा प्रयत्न केला. पण त्यानं हात उंचावतांच ते पट्कन् प्रवाहाच्या ओघांत पडले आणि दुसऱ्याच क्षणीं दिसेनासे झाले.

सदानंदानं दुःखानं सुस्कारा टाकला. पण आता दुःख करण्यापेक्षा स्वतःचा जीव बचावणं अधिक महत्वाचं होतं. प्रवाहाचा वेग आता वाढला होता. ट्रॅमचा खडखडाट, बसचा धडधडाट, अनेक यंत्रांचा विचित्र आवाज ह्यांनी एकत्रित होऊन ध्वनिलहरींच्या आवर्तांचीं अनेक गतिमान आवर्तनं घ्यावींत तसला कांहीसा तो चमत्कारिक वेग होता आणि नादहि होता. प्रवाह संकुचित होत होता आणि तोच त्याच्या आशेचा एकमेव किरण होता. प्रवाहाच्या दोन्ही काठा-वर मघासारख्या चित्रविचित्र आकृत्या भेटत. त्यांतच दात पुढे आलेली श्रीमंत पुरंदऱ्यांची मेनका त्याला ओळखूं येई तर पैशाकरितां वाटेलं तें करावं असा गुरुमंत्र देणाऱ्या त्याच्या जिवलग मित्राची मधुसूदनची–आकृतीहि मध्येच त्याच्या दृष्टिसमोरून तरळून नाहीशी होई. सारे न सारे त्या वेगवान, गतिमान चक्राकार प्रवाहांत लुप्त होत होते. कोणी तर नुसते त्यांत डोकावतांनाच त्यांत झोक जाऊन विनाश पावत होते.

सदानंदाचं डोकं आता भिरभिरूं लागलं. शुद्ध हरपून आपलीहि गत या इतर मानवी ठिपक्याप्रमाणे होईल या भीतीनं त्यानं दात–ओठ गच्चं आवळले. खालच्या ओठांतून रक्ताचीं चिळकांडी उडाली. ओठ टिपून तो सारी शक्ति एकत्रित करूं लागला. इतक्यांत दूरवर त्याला तो लहानगा कीटक दिसला. विचारा अजूनहि विनाशाशीं झगडत होता. सदानंदानं त्याच्या-कडे पाहिलं आणि त्याचं मन त्याच्या आत्मिक शक्ति उंचवळून त्याला वाचविण्यासाठी कीटकाच्या दिशेनं धाव घेऊं लागल्या. आपल्या पावन पादस्पर्शानं यमुनेचं पात्र दुभंगलं ही श्रीकृष्णाची आठवण त्याला त्याक्षणीं झाली. पवित्र सीतेला धरणीनं दुभंगून आपल्या गर्भांत जागा दिली ती स्मृति जीवंत होऊन त्याच्या मनांत जागी झाली. कठोर निश्चयाचं तेज त्याच्या नेत्रांतून ओसंडूं लागलं. आणि हाताच्या आटोक्यांत आलेला कीटक आता अखेरची गटांगळी खाणार असं दिसतांच प्रवाहाच्या असीम वेगांत एक फटकारा मारून त्यानं हात लांबविला आणि त्या कीटकाला धरून प्रवाहाबाहेर ठेवलं.

आणि मग खरोखरच चमत्कार घडला. कसला तरी भयंकर आवाज झाला आणि एवढा गतिमान

(पुढील मजकूर पान ९ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ध्वनितत्त्वाचा प्रथम पुरस्कर्ता

'भा म ह'

प्रा. मधुकर रघुनाथ आष्टीकर

काव्य, काव्यतत्त्व व काव्यनिर्मिति यांना तुच्छ लेखून व सौशब्दत्वाचा* मुक्तकंठाने स्तव करणाऱ्या वैय्याकरणांची कडक शब्दांत हजेरी घेऊन, काव्यशास्त्राचे भरीव सिद्धांत अभिनिवेशाने प्रथम पुढे मांडणारा 'भामह' खचित कुणालाहि आदरणीय वाटेल. तो इ.स.च्या सातव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. त्यावेळीं काव्य निंदिलें जात होतें; अर्थतत्त्वाला वगल दिली जात होती आणि रुक्ष व्याकरण शास्त्र वक्षःस्थल पिटून प्रचारिलें जात होते. पण काव्याचें, केवळ स्वप्रतिभेंतून निर्माण होणारें विचारसौंदर्य आणि कलाहीन शब्दपांडित्याला शोभा आणणारें हृदयहारी अर्थसौंदर्य मात्र गर्ह्यपणें उपेक्षिलें जात होतें ! भामहाने हा पदच्युत पक्ष हिरीरिने पुढे मांडून मूळ मानाचें स्थान त्याला परत मिळवून दिलें. त्याने स्पष्ट सांगितलें:—

'अधनस्येव दातृत्वं क्लीवस्येवास्त्रकौशलम्
अज्ञस्येव प्रगल्भत्वमकवेः शास्त्रवेदनम् ॥

भामह १. ३.

रहिता सत्कवित्वेन कीदृशी वाग्विदग्धता ॥

भामह १. ४

गुरूपदेशादध्येतुं शास्त्रं जडधियोप्यलम् ।
काव्यं तु जायते जातु कस्यचित्प्रतिभावतः ॥

भामह १. ५

पण असें करतांना तो व्याकरणाची आवश्यकता किंवा त्याचें महत्व विसरला होता असें नाही.

'शब्दभिधेये विज्ञाय कृत्वा तद्विदुपासनम् ।
विलोक्यान्यनिबंधांश्च कार्यः काव्यक्रियादरः ॥

भामह १.१०

काव्याचें महत्त्व व्याकरणापेक्षा जास्त आहे हें त्याने पटवून दिलें आणि काव्यशास्त्राचा पाया घालण्यास नीट भूमिका तयार केली.

भामहाचा काव्यालंकार

भरतमुनींनी नाट्यशास्त्र लिहितांना रसनिर्मितींत सहभागी असणाऱ्या अनुभावांच्या एका वाचिक प्रकारांत सर्व काव्यविश्व मर्यादित करून त्याचें केवळ नाट्यप्रयोगोचित शेलके ठोकळ आडाखे सांगून टाकले आहेत. काव्याचें स्वतंत्र असें शास्त्र निर्माण झालें तें नंतरच. उपलब्ध ग्रंथांत ह्या शास्त्रावरील पहिला ग्रंथ म्हणून मानाचा अंगुलीनिर्देश भामहाच्या काव्यालंकाराकडेच करावा लगेल. भामहाचा हा ग्रंथ काव्यशास्त्राच्या भरीव सिद्धांतांनी भरगच्च भरलेला आहे. भामहोत्तरकालांत ज्या अनेक काव्यशोभा—तत्त्वांचा उदोउदो करण्यांत आला, त्या प्रत्येकाचें मूळ स्वरूप ह्या ग्रंथांत औचित्याने चर्चिलेलें आढळतें आणि म्हणूनच त्या मतमतांतरांमध्ये एकसूत्रता पाहण्यासहि केवळ भामहाचीच दृष्टि उपयोगी पडते. आणि म्हणूनच आपल्या शाकुंतलावरील टीकेंत "राघवभट्ट" ह्या ग्रंथाला "आकर" "रत्नभांडार" म्हणून सन्मानाने उल्लेखतो.

संस्कृत काव्यशास्त्राचा खोल विचार करतांना कांही गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत प्रतिसंपन्न. विद्वान कवींचा रसिकहृदयाल्हाददायी काव्यसंभार अनिर्बंध निर्माण झालेला आहे. कुठल्याहि काव्यशास्त्राची पारायणें गुरुचरणाजवळ करून झालेला नाही. डॉ. नोबेल जें म्हणतो की, "हिंदुस्थानांतील संस्कृत कवि काव्यशास्त्रांतील सिद्धांतानुसार आणि विद्वानांनी घालून दिलेल्या ठरीव चाकोरीप्रमाणे आपली काव्यरचना करीत"*, हें विधान धादांत तर्कशून्य वाटतें. निरंकुश

---

* रूपकादिमलंकारं बाह्यमाचक्षते परे ।
सुपांतिङांच व्युत्पत्ति वाचां वाञ्छन्त्यलंकृतिम् ॥
भामह, १.१४.
तदेतदाहुः सौशब्द्यं नार्थव्युत्पत्तिरीदृशी ।
१–१५.

* See "The Foundations of Indian Poetry" by Dr. J. Nobel. Page 7.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवींच्या शोभिवंत काव्यापासून कुठल्याहि मनोवृत्तीच्या रसिकाला सारखाच आनंद लुटता आलेला आहे. कवींनी स्वच्छंद काव्यें लिहिलीं, रसिकांनी आकंठ आनंद लुटला, आणि मग ह्या तृप्त मनांत निनादणाऱ्या त्या काव्य–लहरी विचारवलयें निर्माण करूं लागल्या. ह्या लहरी पुनः-पुनः कां उठतात मनांत, हें काव्य पुनःपुनः कां वाचावसं वाटतं मला; ह्या काव्यापासून निरपवाद आनंद कशामुळे मिळतो; अशा प्रकारें ह्या जिज्ञासेंतून काव्यांतील सौंदर्यतत्त्वाचा शोध सुरू झाला.

याच वेळीं पुनःपुनः वाचण्यांत येणाऱ्या ह्या काव्यसंभाराने रसिकांच्या मनांत कांही अपेक्षा निर्माण केल्या, टिकविल्या आणि वाढविल्याहि. आणि त्याचा परिणाम असा झाला की चटावलेला रसिक, काव्याच्या चांगलें–वाईटपणाबद्दल बोलण्याचा प्रसंग येतांच त्या अपेक्षा स्पष्टपणें बोलून दाखवूं लागला आणि काव्य-शास्त्राची इमारत हळूहळू उभारली जाऊं लागली. काव्यानेंच काव्याचें शास्त्र निर्माण केलें. मात्र तें वदविलें गेलें, तें रसिक टीकाकाराच्या मुखानें.

अर्थात् मुखपरत्वें भाषा बदलते व त्यामुळे तत्त्व एकच जाणवलें तरी त्याचा विचार व स्वरूप–वर्णन मात्र भिन्न भिन्न शब्दांनी केल्यामुळे ओघानेंच तत्त्वाचें ऐच्छिक नामकरण सुद्धा निरनिराळ्या शब्दांनी झालें.

काव्यांत शब्द व अर्थ ह्या दोहोंचेंहि सारखेंच महत्त्व असतें. शब्द बाह्यांग होत, तर त्यांत सुखासीन पहुडलेला अर्थ काव्याचें अंतरंग होय. दोहोंचेंहि सौन्दर्य कवि एकाच प्रतिभेनें खुलवितो आणि म्हणूनच दोहोंचेंहि सौन्दर्य रसिकांना सारखेंच आनंददायी असतें. आणि म्हणूनच टीकाकार सारख्याच महत्त्वाने, दोहोंचेंहि स्वरूप वर्णन करून सांगतात. फरक पडतो तो एवढाच की, एखादें तत्त्व नवीन आढळलें असलें किंवा त्याचा पाहिजे तेवढा व पाहिजे त्या प्रकारें विचार झालेला नसला तर मात्र त्याच्या वर्णनांत ग्रंथाचा बराच भाग खर्ची पडतो व शेष भागांत चर्वितत्त्वांचा संशोधनपूर्वक विचार केला जातो. तेव्हा काव्यशास्त्र-ग्रंथांच्या नांवांवरून अगर त्यांत विस्ताराने व पांडित्य-पूर्वक चर्चिलेल्या नूतन तत्त्वावरून अमुक एक टीकाकार (काव्यशास्त्रग्रंथकर्ता) अमुक तत्त्ववादी आहे अगर त्यानें अमुक काव्यशोभातत्त्वाचा संप्रदाय सुरू केला हें म्हणणें जरा धाष्टर्याचेंच होईल

आणि म्हणूनच भामहाबद्दल लिहितांना तो अलंकारसंप्रदायी होता म्हणून म्हणावयास आम्ही तयार नाही, किंवा डॉ. शंकरन् म्हणतात तद्वत्, त्याने रस-विरोधी संप्रदाय प्रवर्तित केला असें भलतेंच विधान त्याचेबाबत करीत नाही. परंपरागत ज्ञानभांडारांत आपली भर घालून ती अमोल ठेव भावी पिढीच्या हवाली करावी ह्या परंपरेला अनुसरून भामहाने ज्या-प्रमाणें अलंकाराचें पूर्वसंग्रथित ज्ञान स्वतःची भर घालून दिलें* त्याप्रमाणें रसाचीहि औचित्यपूर्ण सोय करून दिली. 'रीतीं'त रीतसरपणा आणला. 'गुणाचे गुण पार-खले. 'वृत्ति'बाबतहि सम्यक्वृत्ति दर्शविली आणि सर्वच बाबतींत 'औचित्य'विचार करून 'ध्वनिकारा'च्या मतें, ज्याचें नामकरण "ध्वनि" असें केलें त्या तत्त्वाचा 'वक्रोक्तीनें' प्रथम पुरस्कार केला.

डॉ. डे, राघवन् प्रभृति विद्वान् म्हणतात की 'भामहा'नें 'ध्वनि' अलंकारांत अंतर्भूत केला. त्याला आनंदवर्धनप्रणीत "ध्वनितत्त्व" स्वतंत्ररीत्या प्रधानत्वानें जाणवलें नव्हतें. पण हें म्हणणें गैर आहे. काव्यांतील व्यंजकतेची गोडी प्रथम भामहानेंच ओळखली. बुधांनी वैयाकरणांच्या 'स्फोटवादां'चें अंधानुकरण करून ज्या काव्यशोभातत्त्वाला 'ध्वनि' नांव दिलें तें काव्यशोभा तत्त्व भामहाच्या प्रथम लक्षांत आलें.

आमच्या वरील विधानाच्या सिद्धतेस्तव आम्ही प्रथम भामहोत्तर–'ध्वनिकारिका'कर्ते 'आनंदवर्धन' ज्या तत्त्वाला किंवा ज्या उक्तीला "ध्वनि" म्हणून संबो-धतात, त्यांचीं लक्षणें सांगतों. ध्वनि–काव्योक्तींत वेचक शब्द वापरलेले असतात. प्रतिभाशाली कवि आपल्या ध्वन्युक्तींतील ते शब्द असे निवडतो की जे खालील कार्य सहज करतील.

(अ) ते शब्द प्रथम कोषांतील अर्थानुसार (संकेतितार्थानुसार) वाच्यार्थ दाखवितात. ह्यांत त्यांची अभिधाशक्ति कामीं येते. पण हा अर्थ कवीला इष्ट नसतो. कारण कधी कधी हा वाच्यार्थ इष्ट

---

*इति निगदिताः तास्ताः वाचामलंकृतयो मया बहु-विधकृतीर्दृष्ट्वान्येषां स्वयं परितर्क्य च। भामह ५.६९.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्थाच्या (प्रधानव्यंग्यार्थाच्या) अगदी विरुद्ध देखील असतो.

पण त्या शब्दांची गति इथेच खुंटत नाही. अभिधाशक्ति कामीं आल्यावर व वाच्यार्थ प्रतिपादन केल्यावर ते शब्द आणखी एका अर्थाची प्रतीति करून देतात. तोहि अर्थ त्याच शब्दांनी सांगितलेला असतो पण तो अभिधाशक्तीने नव्हे तर 'व्यंजना' नामक नव्याच शक्तीच्या साहाय्याने. तें कसें हें पहा.

(अ) 'वक्रवाक्' कवींच्या उक्तींत विवेकेंकरून वापरलेले वेचक शब्द असतात.

वक्रवाचां कवीनां ये प्रयोगं प्रति साधवः ।
प्रयोक्तुं येन युक्ताश्च तद्विवेकोऽयमुच्यते ।
भामह ६. २३

ते क्रमागत* असतात—म्हणजे परंपरागत विशिष्ट अर्थ दाखविणारे असतात; संकेतितार्थ दाखविणारे असतात. म्हणजे ते वाचल्याबरोबर एक संकेतितार्थ-वाच्यार्थ लोकांना प्रथम कळतो. (अर्थातच तो अभिधा शक्तीने कळेल.)

(आ) ते शब्द† क्रमागत, संकेतित किंवा वाच्य अर्थ, ह्यांहून भिन्न अशा अर्थाची प्रतीति घडवितात. त्यांत 'व्यंजनचारुता' आहे असें भामह म्हणतो. हें 'व्यंजनचारुत्व' वाच्यार्थाने दाखविलेल्या अलंकारांनाहि मागे टाकतें म्हणून तेंच खरें काव्य-शोभातत्त्व आहे.

* क्रमागतं श्रुतिसुखम् —भामह ६, २८

† शब्दं अर्थ्यं उदीरयेत् ।
अतिशेते ह्यलंकारं अन्यं व्यंजनचारुता ॥
—भामह ६. २८

अशा प्रकारें व्यंजन-चारुत्व-पूर्ण जी उक्ति तीच भामहाची 'वक्रोक्ति'* आहे.

वरील सावार विवेचनावरून कुणालाहि स्पष्ट कळून येईल की पुढे 'ध्वनि' म्हणून ज्याचें नामाभिधान करण्यांत आलें तेंच तत्त्व भामहाने 'वक्रोक्ति' नांवाने सांगितलें आहे.

शिवाय ह्या तत्त्वाला 'ध्वनि' म्हणून जें नांव देण्यांत आलें आहे, तें वैय्याकरणांच्या स्फोटतत्त्वाला अनुसरून देण्यांत आलें आहे. आणि भामहाला तर वैय्याकरणांचा हा स्फोटवाद मुळीच मान्य नव्हता.

शपथैरपि चादेयं वचो न स्फोटवादिनां
नभः कुसुममस्तीति श्रद्दध्यात्कस्सचेतनः ॥
भामह ६. १२.

ध्वनीची व भामहकथित वक्रोक्तीची इतर बारीकसारिक लक्षणें व भेदखील परस्परांशीं अतिशयत्वानें जुळतांना आढळतात. जसें - ध्वनीचे मुख्य दोन प्रकार (१) शब्दशक्तिमुल (२) अर्थशक्तिमुल; वक्रोक्तीचे सुद्धा तसेच दोन प्रकार आहेत.

'शब्दाभिधेयवक्रोक्तिरिष्टा वाचामलंकृतिः ।'
भामह १. ३६

यासाठी वरील सर्व विवेचन लक्षांत घेऊन आम्ही म्हणतों की, 'ध्वनि' म्हणून ज्याला संबोधिलें जातें† त्या तत्त्वाचा प्रथम पुरस्कर्ता "भामह" होय.

* युक्तं वक्रस्वभावोक्त्या सर्वमेतदिष्यते ।
भामह १, ३०

† काव्यस्यात्मा ध्वनिरिति बुधैः यः समाम्नातपूर्वः ।
ध्वन्यालोक-१, १

प्रवाह

(पान ६ वरून)

प्रवाह पण एकदम कोरडा झाला आणि आटला जाऊन रखरखीत पृष्ठभागाचा एक स्थिर गतिहीन तुकडा फक्त राहिला.

ठण्ण !' आवाजांच्या दिशेनं सदानंदानं पाहिलं. साडेचार वाजले होते. समोर पाहिलं तों टेबलावर खूप कचरा साचला होता. पायापाशीं कसलीशी काचेची कुपी फुटून तिच्या काचा इतस्ततः पसरल्या होत्या. सदानंदानं काचेचे तुकडे गोळा केले आणि कोपऱ्यांत टाकले. कपाळावर आलेले केस त्यानं मागे सारले आणि रखरखीत दाढीवरून तो हात फिरवूं लागला. छे, छे. हें सगळं आवरलं पाहिजे आता. उद्या केवढं तरी काम करायचं आहे. निर्वासितांविषयीच्या परिषदेला गेलेले लालाजी उद्या परत येतील; त्यांना काय हा असला अवतार दाखवायचा ! गिरण्यांतून संपाचं वारं वाहतं आहे आणि उद्या गेटाजवळ सभा आहे. तिथं काय अशा सुतकी चेहऱ्यानं जायचं ?

सदानंद झट्कन् खुर्चीवरनं उठला. टेबलावरचे जिन्नस त्यानं भराभर आवरले आणि न्हाणीघरांत जाण्यासाठी त्यानं खोलीचं दार उघडलं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांही कविता

पलीकडे जें शब्दाच्या

पालवता इंद्रधनु
नाचे प्रकाश पिवळा
धरतिच्या अधरांत
हसे अंकुर कोवळा

हळूवार लहरीचा
स्पर्श नाजुकसा होत
इवल्याशा पर्णातून
झरें अपूर्व संगीत

लाट चिमुकली खेळे
भोवऱ्यांत सरीतेच्या
विसरली मत्स्यकन्या
सिमारेषा जाणिवेच्या

ऐकतांना भावगीत
हृदयींचें निर्झराच्या
बहरली भावसत्यें
ओठीं हिरव्या तृणाच्या

चितारतें मन कांही
निलीम्यांत आकाशाच्या
थरथरतें स्पंदतें
पलीकडे जें शब्दाच्या

तुळशीराम काजे

जग सारें झोपलेलें

जग सारें झोपलेलें
जागा एक रातकिडा
अंधारांत आडोशाला
किट किट करी वेडा।

एकांतांत सळसळ
वृक्षलता हालतात
शुष्क पानें गळतात
येतां कधी खिन्न झोत।

दाटलेले ढग कधी
हळूहळू पांगतात
आणि नभींचा काळोख
खाली होई अधिकच।

दूर कोठेतरी रानीं
अमंगल कोल्हेकुई
श्वान भुंकतात कोठे
विरतसे नाद तोहि।

एकांताची खिन्नतेची
जटा धरूनीया काय
माझ्या गत आठवणी
भूतापरी नाचतात।

मधुकर केचे

देव बोलला !

देव बोलला, 'होवो !'—झालें.

धनकण ऋणकण परमाणूंतिल
तेजोमेघीं वायु गरगरे
माळ रवींची ये आकारा
धरा उपजली, रसांत खदखद

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साय दुधावर   आल्पस्, हिमालय
अगणित अॅमिबा   विशाल प्राणी
निबिड अरण्यें   –आणिक मानव!
देव बोलला,   'होवो!'—झालें.

बकाल वस्ती   कोंदट घरटें
खाटेवरती   नट्टापट्टा
तुटून पडला   कुणी मद्यपी
बळी व्हावया   त्या व्याधीचा!

बँड पताका   धार विदेशी
अपूर्व लखलख   बहु नटरंगी
तार विजेची   जोडित असतां
गेला कोणी   देवापाशीं!

कुठे मवाली   कुठे हवेली
बसला वेढा   पेटे दंगा
गेली अब्रू   हातोहातीं
रक्त सांडलें   कोचांवरती!

अति वर्षावीं   पूर लोटले
पुनरपि जलयुग   विध्वंसाया
अखंड अश्रू   जलीं मिसळले
झंझावातीं   आणि उसासे!

देव बोलला,   'होवो!'—झालें

'होवो आणिक!'   देव बोलला,
'होवो! होवो   असेंच आणिक!'
देव बोलला   परी न झालें
–मानव आता   होता ज्ञानी!

धनकण ऋणकण   दास तयाचे
तेजोमेघीं   त्याची हुकमत
कोठि आणखी   व्योम वाहिनी
अवनीवरती   त्याचें 'होवो!'

'ज्ञानतरूच्या   फळेंच केला
घात अखेरिस!'   देव बोलला
आणि विचारीं   मूक राहिला!

—द. चिं. सोमण

मनाच्या भंगल्या मशीदीवर —

उजाड पडक्या वाड्याच्या भिंती
ओसाड अंधारा शेजारीं आड
वाकल्या वडाची निर्जीव फांदी
फांदीस लोंबतें पक्षाचें घड

कण्हत कुंथत वाहतो ओढा
कमान पुलाची खचली; लांब
फटक पांढरा दरगा; खडा
पहारा करतो दाराशीं खांब

निंबाच्या चिंचेच्या विद्रूप छाया
गुंतून मातींत झांवल्या जळीं
घेटूक करून भेसूर संध्या
लपली इथेंच रडते जाळीं

थडग्याप्रमाणे खंडित ढग
नभाच्या घुमटीं निस्तेज चांद
फकिराप्रमाणे (येऊन जाग)
पाखरूं करून घालतें साद

उजाड पडक्या वाड्यांत पडे
फटक पांढऱ्या चंद्राचें तेज
मनाच्या भंगल्या मशीदीवर
फिकट गीताच्या फुलाचा साज

—दत्तात्रेय कुळकर्णी, नागपूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पायवाट

थकलेली पायवाट
पाचोळ्यांत विसावली
आभाळाच्या भाळावर
यामिनीस नीज आली !

चांदण्याचें निश्वासित
ओथंबलें तृणावर
आणि रातराणीवर
फुले चंदेरी बहर !

करी वठला पिंपळ
भयानक हातवारे
आणावया आकाशींचे
घरेवर निळे तारे !

पाचोळ्याच्या शय्येवर
तेज उधळी काजवे
थकलेली पायवाट
ढाळी स्वप्नांत आसवें !

'वक्षावर उठलेले
पथिकांच्या पाउलांचे
व्रण कधी प्रभूराया
आहेत हे मिटायचे ?

उभी तिच्या देवापुढे
थकलेली पायवाट
इतक्यांत प्रभातीचें
शिंग वाजवी कुक्कुट !

स्वप्न-भंग होई तिचा
प्रभा फाके गगनांत
पथिकांची रीघ लागे
दूर दूर क्षितिजांत !

थकलेली पायवाट
उसासते पाचोळ्यांत
पथिकांच्या पाउलांचे
व्रण उठती उरांत !

—बाबा मोहोड.

फुलांत हसतें—

फुलांत हसतें गगन विशाल
क्षणांत विलसे अनंत काळ
बिंदूमध्ये दर्या उसळे
किरणांत उजळती दिशाहि लाल. १

किणकिण नादीं ध्वनी युगाचा
गुरकुलींत अन् रमतें जीवन
मृत्यूसाठी बीं बोराची
पापणींत अन् लपतें यौवन. २

आकाराला रेषा पुरते
केसरांत नी सौरभ उरतो
बुडबुड्यांत ही सृष्टी फिरते
मनुजासाठी माती पुरते. ३

—विश्वास.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा

पंख

—राम डोके

संध्याकाळचे साडेसात वाजून गेले तरी डॉ. ताराबाई देशमुखांच्या 'स्मृतिसदनां'त अजून एकहि दिवा लागला नव्हता. वास्तविक रोज दिवेलागणीची वेळ झाली की त्यांच्या टुमदार बंगलींतील छोटासा दिवाणखाना 'ट्यूब-लॅंप'च्या मंद आकाशी रंगानं न्हाऊन निघे. त्यांतल्या हिरवळी रंगाच्या भिंती एका नव्याच तेजाने लकाकल्यासारख्या भासत. अन् तिथले गर्द रंगाचे निमपारदर्शक पडदेहि बाहेरून जाणाऱ्या येणाऱ्यांचं क्षणभर लक्ष वेधून घेत. पण आज !—

आज तिथं एकहि दिवा नव्हता. तिथल्या भिंती नेहमीप्रमाणं लकाकत नव्हत्या. तिथले पडदे विद्युद्दीपांनी उजळून निघाले नव्हते. आज सगळीकडे अगदी अंधार होता.

अन् तशा त्या अंधारांतच ताराबाई आपल्या खोलींतील पलंगावर पहुडल्या होत्या. बराच वेळ एकसारख्या येरझारा घालून घालून त्यांचे पाय चांगलेच ठणकत होते. खूप वेळ अखंड विचार करून करून त्यांचं मस्तक भणभणत होतं. अन् मधूनमधून नकळत येणारे अश्रू पुसून पुसून त्यांचे डोळे खुपत होते—चुरचुरत होते—चांगलेच लाल झाले होते.

आज सकाळींच त्यांच्या एकुलत्या एका लाडक्या अविनाशनं त्यांना ऐकवलेली ती अगदी अनपेक्षित आणि भयंकर बातमी ! ती ऐकल्यापासून त्यांना कांही सुद्धा सुचत नव्हतं. दिवसाच्या उजेडांत त्यांचं संस्कृत मन भावनांना विवेकाचा बांध घालूं शकलं. कारण तसं करण्यावाचून गत्यंतर नाही ह्याची त्यांना जाणीव होती. पण रात्रीची चाहूल लागतांच त्यांच्या मनावरील विचाराचं कवच हळूहळू गळूं लागलं, अन् प्रयत्नपूर्वक दडपून ठेवलेल्या भावना दुप्पट वेगानं वर उफाळूं लागल्या—

त्यांना कमालीचा अस्वस्थ करून सोडणारा सकाळचा तो प्रसंग !

नेहमीप्रमाणंच आज सकाळीं ताराबाई अन् त्यांचा मुलगा अविनाश टेबलावर जेवण करीत होती. रोज जेवतांना अविनाशानं कॉलेजांतल्या, क्लबांतल्या, गमतीदार गोष्टी सांगणं अन् ताराबाईनी त्या तितक्याच तत्परतेनं ऐकणं हा त्यांचा ठराविक कार्यक्रम असे. पण आज सकाळीं झोपून उठल्यापासूनच अविनाश जरा गंभीर दिसत होता. अन् त्यावेळींहि तो खाली मान घालूनच अगदी मुकाट्यानं जेवण उरकीत होता. कांही वेळानंतर त्यानं आपली मान हळूच वर केली अन् ताराबाईच्या नजरेला नजर न भिडवतां सावकाश पण निश्चयी स्वरांत म्हटलं—

"आई, आज मला तुला कांही सांगायचं आहे."

"काय रे ? मघापासनं बघतेच आहे मी की तुझ्या मनांत कांहीतरी चाललंय नक्की. काय सांगायचंय तुला ?"

"सांगतों पण तूं रागावशील. खूप रागावशील."

"अरे सांग तर—"

"तूं रागवायचं नाहीस."

"अं ऽऽहं ऽ ! सांग."

"मी 'एअर-फोर्स'साठी 'सिलेक्ट' झालोंय. पायलट' म्हणून मला उद्या निघायचंय अंबाल्याला जायला."........

...अन् अवीनं एकाच दमांत कसंबसं पुरं केलेलं तें वाक्य ऐकतांच ताराबाईना आश्चर्य नि दुःख ह्यांचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागोपाठ धक्के बसले. अवि असं कांहीतरी भयंकर ऐकवेल असं त्यांना स्वप्नांतहि वाटलं नव्हतं...

त्यांच्या हादरलेल्या मनांत एका क्षणांतच विचारांचं वादळ उठून गेलं....

"...अवि! त्यांचा लाडका अवि! पतीची एकुलती एक स्मृति म्हणून मागे राहिलेला त्यांचा लाडका अवि!...अन् अंतराळांत आधारावाचून तरंगणारं तें विमान!...वर्तमानपत्रांतून नियमितपणें येणाऱ्या त्या विमानअपघाताच्या बातम्या....छे...छे...माझा अवि अशा भयंकर धोक्याच्या जागेवर जाणार नाही. मी त्याला तिथं जाऊं देणार नाही. असा घट्ट पकडून ठेवीन....

त्याला तिथंच कशाला जायला हवं? त्याला काय कमी आहे?...माझा बंगला...माझी मोटार.. माझी बँकेंतील एवढी मोठी शिल्लक...त्यानं विलायतेला जावं, वाटेल तितकं शिकावं. पण...पण...'एअर-फोर्स'ला अन् तेंहि 'पायलट्' म्हणून...

—"नाही. नाही अवि. तिथंच जाण्यावाचून तुझं काय अडलं आहे? तूं आय. ए. एस.ला बसणार होतास ना? सहज नंबर येईल तुझा."—ताराबाई दुसऱ्याच क्षणीं आवेगानं म्हणाल्या.

"खरं सांगूं आई, मला या कुठल्याच गोष्टींत राम वाटत नाही. बस्स...फक्त निळ्यानिळ्या आकाशांत पाखरासारखा स्वैर संचार करावासा वाटतोय्... तूं नकार देऊं नकोस आई."

"पण...पण...राजा, किती भयंकर धोका आहे त्यांत. अन् आजकाल रोजच्या वर्तमानपत्रांतनं..."

"विमान अपघाताच्या बातम्या सारख्या येत असतात, होय ना?"...अवि नेहमीप्रमाणं मनमोकळं बेफिकीर हसला, अन् उंचीनं त्याच्या खांद्याच्याहि खाली लागणाऱ्या आईचे एखाद्या लहान पोरीसारखे खांदे हलवीत म्हणाला—

"अग, मरण यायचंच असेल तर इथं खाटेवर-सुद्धा येईल अन् नाहीतर हजारों फूट उंचीवरून खाली पडूनसुद्धा कांही होणार नाही मला."

"पटतं रे सारं तें मला!...पण...पण... अवि तूं गेल्यावर मी एकटीच काय करूं इथं...तुझ्याशिवाय कोण आहे मला. कसं...कसं सांगूं तुला मला काय वाटतय् तें."

"आई, असं काय करतेस? माझी ही एवढीच इच्छा आहे. देना मला हसत हसत परवानगी? अं?"

यावर ताराबाई थोडा वेळ अगदी गंभीरपणें विचार करीत बसून राहिल्या. अन् नंतर संथ निश्चयी स्वरांत म्हणाल्या—

"अवि, तुला हसत हसत परवानगी देणं नाही होणार माझ्यानं."

यावर अवि कांहीच बोलला नाही. तो मुकाट्यानं तिथून निघून गेला.......

अन् तेव्हापासून......

......अंधारांत पलंगावर एकसारखं पडून राहण्याचा ताराबाईंना कंटाळा आला. त्या हळूच उठल्या, नि त्यांनी थरथरत्या हातानं दिव्याचं बटण दाबलं. आजूबाजूच्या भिंती प्रकाशानं न्हाऊन निघाल्या होत्या. त्या शांत नजरेनं इकडेतिकडे पाहूं लागल्या...... नानाप्रकारच्या खेळांत अविनाशनं मिळवलेले समोरच्या कपाटांत दाटीवाटीनं बसलेले चांदीचे कप, पदकं... नि त्याच्यामागं उभा असलेला अविनाशचा फोटो... ती हातांतली टेनिसची रॅकेट धरण्याची ऐट...तो हसरा चेहेरा...ती उंच धिप्पाड आकृति...नि चमकदार डोळ्यांतला फोटोंतहि अगदी स्पष्ट दिसणारा हट्टीपणा...छे, एकदा एक गोष्ट ह्याच्या मनानं घेतली की दुसऱ्या कुणाचं अगदी ऐकायचा नाही हा.....

त्या फोटोकडे बघतां बघतां नकळत त्यांच्या डोळ्यांत अश्रू गोळा होऊं लागले. त्यांनी तावडतोब दिवा बंद केला, नि पुन्हा त्या पलंगावर येऊन पडल्या. पण पलंगावर पडल्यावरहि अवीचे ते डोळे त्यांच्या दृष्टीपुढून हलेनात. विशेषतः त्या डोळ्यांतील ती एक विशिष्ट प्रकारची चमक त्यांच्या नजरेपुढे सारखी तरळत होती. तसल्याच प्रकारचा भाव, तीच चमक, आपण आणखी कुठल्यातरी फोटोंत पाहिली आहे असं त्यांना आठवूं लागलं. अन् अगदी सहजगत्या त्यांचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वतःचा तारुण्यांतला फोटो त्यांच्या नजरेपुढे येऊन उभा राहिला......

त्या एकदम दचकल्या. अविनाशच्या चेहऱ्याचीच ठेवण आपल्या चेहऱ्यासारखी नाही तर त्याचे डोळे, ती चमक...तो हट्टीपणा...त्या भयंकर गंभीर झाल्या. आपल्या तारुण्यांतले दिवस त्यांना आठवूं लागले...

तें तेव्हांचं कॉलेज ! ते वादविवाद ! आणि ते आपले जुन्या सनातनी विचारांचे आई वडील ! कॉलेजांत असेतोपर्यंत आपल्याला अगदी तळहाता-वरील फोडासारखं जपणारे आईबाबा ! आणि नंतर... नंतर...

मनोहरपंतांचा—त्यांच्या दिवंगत पतीचा चेहेरा त्यांच्या दृष्टीपुढे तरळूं लागला. त्यांची कॉलेजांत झालेली ओळख...मैत्री...प्रेम...

आपण मनोहरशीं लग्न करणार हें बाबांना कळल्यावर केवढे संतापले होते ते ! आपल्यापासून केवढ्या निराळ्या अपेक्षा होत्या त्यांच्या ! ब्राह्मणाची मुलगी अन् ती एका अगदी हलक्या जातीच्या मुलाशीं प्रेमविवाह करणार ! केवढा भयंकर धक्का बसला होता हें ऐकून त्यांना ! त्यांच्या भोंवतीचा तेव्हांचा तो समाज ! त्यांच्या प्रतिष्ठेच्या तेव्हांच्या त्या विशिष्ट कल्पना ! अन् आपण त्यांना मनोहरपंताशीं नक्की लग्न करण्याचं स्पष्ट शब्दांत सांगितल्यावर झालेला त्यांच्या अंगाचा तिळपापड !

...आपण मनोहरशीं लग्न केल्यावर अन्नपाणी वर्ज्य केल्यानं अतिशय कृश झालेली त्यांच्या वडीलांची ती रागीट हट्टी मूर्ति त्यांच्या नजरेसमोर येऊन उभी राहिली. आपलं रूप, नि स्वतःची गडगंज संपत्ति ह्यांच्या बळावर घरंदाज नि सुप्रतिष्ठित घराण्याशीं संबंध घडवून आणण्याच्या त्यांच्या आशा ! किती अपेक्षेनं त्यांनी त्या उराशीं कवटाळल्या होत्या ! अन् त्या पार धुळीला मिळाल्यावर एकसारखी खंगत गेलेली त्यांची प्रकृति...अन् शेवटीं "अरे ते बघ रावबहादूर जोशी...ह्यांच्या मुलीनंच हलक्या जातीच्या मुलाशीं लग्न केलं बरं कां !" असे उद्गार ऐकतां ऐकतां त्या मानधन म्हाताऱ्यानं आपणहून हळूहळू घडवून आणलेला आपला मृत्यु...

छे, किती हट्टी होते आपले बाबा ! आपलं मन, आपल्या आवडीनिवडी, हें सारं कसं जाणलं नाही त्यांनी...

अन् हें सारं आठवत असतांनाच त्या स्वतःलाच विचारूं लागल्या—

"तेव्हांचे ते बाबा, नि आताची मी ! सारख्याच अवस्थेत आहोंत का आम्ही ! अविविषयी किती गोड गोड स्वप्नं बांधलीं होतीं मीं उराशीं ! माझा अवि नेहेमी माझ्या जवळ राहील. खूप शिकेल. मोठा होईल ...त्याला मी गोडसा संसार थाटून देईन, नि त्याचा तो रम्य संसार डोळे भरुन पाहत असतांनाच एक दिवस त्याच्याच मांडीवर..."

"माझ्या बाबांनी माझ्याविषयी स्वतःच्या अशा कांही अपेक्षा बाळगल्या होत्या तशाच मीहि माझ्या अविविषयी बाळगल्या आहेत का ? पण मी ! मीं काय केलं तेव्हा ? मी त्यांचं न ऐकतां स्वतःला जें पटलं—योग्य वाटलं तें केलं—तसंच माझा अवीसुद्धा...पण... पण..."

"छेः, मी माझ्या बाबांसारखा माझ्या अवीला विरोध करणार नाही. त्याला वाटेल तिथं जावो तो... सुखी राहो... माझा आशीर्वादच आहे त्याला. त्याला आता स्वतःचे पंख फुटले आहेत. आईच्या पंखाखाली तो किती दिवस राहणार ?..."

डोळ्यांत गोळा झालेले अश्रू ताराबाईंनी निश्च-यानं पुसून टाकले. त्यांच्या मनावरील भावनांचा ताण कमी होऊन त्यावर हळूहळू विचारांचा पगडा बसूं लागला. त्या गंभीरपणें विचार करूं लागल्या—"खरंच, हें कालचक्र भयंकर वेगानं फिरत आहे. अन् एक पिढी, दुसरी पिढी...तिसरी पिढी—सारं जगच पुढे पुढे चाललं आहे."

त्या विचार करीत बराच वेळ तशाच पडून राहिल्या......

......दुसरे दिवशीं सकाळीं त्या नेहेमीपेक्षा बऱ्याच लवकर उठल्या अन् त्यांनी नोकराला हाक मारून विचारलं.

"काय रे अविबाबा काय करताहेत ?"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"तयारी करताहेत जी गावाला जायची; थोड्या वेळानं मला टांगा घेऊन यायला सांगितलं आहे."

"हं हें बघ, टांगा आणूं नकोस. अन् त्या ड्रायव्हरला सांग गाडी पोर्चमध्ये आणून ठेवायला."

"जी."

नोकर निघून गेला.

ताराबाईंच्या मनांत विचार आला. उद्यापासनं आपण या घरांत एकट्या. आता आपल्या अंगणांत बॅडमिंटनसाठी अवीच्या मित्रांचा धुडगूस नाही. आता आपल्या ओळखीचा तो अवीचा मोटार-सायकलचा आवाज आपल्याला लांबून ऐकूं येणार नाही. आपण हौशीनं अवीसाठी मुद्दाम बांधवून घेतलेली समोरची सुरेख खोली आता अगदी रिकामी...उद्यापासनं आपण या घरांत एकट्या...एकट्या......

त्यांनी आपले अश्रू प्रयत्नपूर्वक आवरले. त्या घाईघाईनं अवीच्या खोलींत गेल्या नि खाली वाकून 'होल्ड-ऑल'चा पट्टा आवळीत असणाऱ्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत हळुवार आवाजांत म्हणाल्या--

"अवी, अरे आटप आता. गाडीला, फक्त पंधरा मिनिटं राहिलीं आहेत. नाहीतर नेहमी सारखी घांदल करशील पुन्हा...कांहीतरी विसरशील...चल लवकर, आपल्याला निघायला हवं आता."

"आपल्याला! आई, तूं येते आहेस स्टेशनवर?" अवि आश्चर्यानं उद्गारला.

"मग त्याशिवाय गाडी कशी सापडेल तुला वेळेवर? अं!"

"आई, आई," नेहमीप्रमाणं एखाद्या लहान मुलीसारखे आईचे खांदे हालवीत अवि आनंदानं उद्गारला..."मला वाटलं तूं माझ्यावर खूप रागावली आहेस...तूं माझ्याशीं बोलणार नाहीस...मला पोचवायला स्टेशनवर येणार नाहीस..."

"चल. वेडा कुठला. अजून सुद्धा तुला कांही कळत नाही"......

"'ताराबाईंनी अवीला स्टेशनवर पोचवलं. गाडी सुटायच्याच बेतांत होती.

दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत अवि चढला, अन् जड घोगऱ्या स्वरांत म्हणाला...

"आई...येतों..."

त्याचे डोळे अश्रूंनी काठोकाठ भरले आहेत असा ताराबाईंना क्षणभर भास झाला. पण त्या शांत स्वरांत म्हणाल्या—

"येहं ऽऽ! अन् जपून...अन् पोचल्याबरोबर तावडतोब पत्र घाल...विसरूं नकोस..."

गाडी सुरू झाली. अवीच्या हातांतला रुमाल हळूहळू दिसेनासा झाला...अवीला घेऊन गाडीचीं चाकं पुढे पुढे चाललीं होतीं......

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवितेची नवी प्रक्रिया

लेखक—भ. प्र. मोहरीर, एम्. ए.

मराठी कविता ही आरंभापासून प्रयोगशील आहे. गेल्या अर्धशतकांत मराठी कवितेच्या अंतरंगांत होत गेलेला बदल तर विशेष अभ्यसनीय आहे. अलीकडे मराठी कवितेचें स्वरूप इतकें बदलून गेलेलें आहे की, पूर्वापार चालत आलेल्या साहित्यशास्त्राच्या मूलतत्त्वांची फेरतपासणी करण्याची आता पाळी आलेली आहे. काव्यांतील या नव्या प्रवृत्तीची मीमांसा करतांना हा बदल वृत्तिदर्शक असून कालनिरपेक्ष आहे असें मांडण्यांत येतें. पण हा बदल गेल्या दशकांतील काव्यप्रक्रियेशीं इतका निगडित आहे की तो कालदर्शक आहे असें समजणेंच भाग आहे !

नवसाहित्यांत सध्या आशय आणि अभिव्यक्ति यांचा नवा प्रयोग चालूं आहे. त्यामुळे काव्यस्वरूपांत व रचनेंत मूलभूत पालट पडला आहे. नव्या संज्ञा, नवीं प्रमेयें व नवी संगति काव्यरूपाने अवतरूं लागली आहे. काव्यांतील अमूर्ताशय मूर्त कल्पनाचित्रांनी प्रगट होऊं लागला असून प्रतीकें व प्रतिमा यांचें अबोध सौंदर्य कवितेंतून विखुरलें आहे. नेणिवेंतील निगूढ व्यापारांनी मानवी अनुभूतींभोवतीं जाळें विणलेलें आहे व अप्रगट आंतराशय प्रगट होण्याकरिता धडपड करीत आहे. काव्याच्या नव्या प्रवृत्तीवर टीकाकारांनी सडेतोड टीका केली हेंच तिचें वैफल्य आहे व साफल्यहि आहे.

नव्या प्रक्रियेचा उद्भव

कवितेचे विषय, प्रगटीकरणाची पद्धति, आशयाचे सर्वमान्य संकेत यांवर जुन्या काव्यमूल्यांची उभारणी झालेली होती. अवलोकन, स्मरण व चिन्तन या क्रमाने कवीच्या काव्यरचनेला प्रेरणा मिळत असे. एखाद्या भावनेचा ठसा अंतःकरणावर उमटल्यावर आविष्काराचीं सारीं कलात्मक बन्धनें पाळून कवि काव्यनिर्मिति करीत असे. म्हणून कवितेचें रसग्रहण करण्याकरिता कवीच्या मानसिक भूमिकेंतहि शिरावें लागे. आनंदनिर्मिति हें काव्याचें प्रधान प्रयोजन. त्याची पूर्तता सौंदर्य-वादामुळेच होते. त्यामुळेच गेल्या कांही पिढींतील कवि सौंदर्यवादी आहेत.

काव्यानंदाला 'ब्रह्मानंद सहोदर' म्हणून उल्लेखिलें आहे. 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा' प्रतिभाशक्तीची अलौकिक कृति म्हणजे काव्य. कवि अभिजात असला तर त्याच्या हातून 'अमर अमर्त्य कला-शिलालेख' तयार होतात. स्वतः कवीला काव्यतंद्रीची व 'उन्मनी'ची अनुभूति असल्याखेरीज काव्यनंदाचें त्याचें सामर्थ्य लटकें पडतें. कल्पकतेची दिव्य देणगी लाभली म्हणजे गगनाला गवसणी घालण्याचें अवसान येतें. 'नियतीनें' दिलेल्या 'नियमरहित' काव्यशक्तीचा संचार सुरू झाला म्हणजे लौकिक बंधनें शिथिल होऊं लागतात. काव्यशास्त्राचे हे जुने संकेत आखीव व नेमस्त आहेत. कवितेचें कार्य, कवितेचा हेतु व कवितेचें अंतिम प्रयोजन यासंबंधी त्याने निश्चित नियम घालून दिलेले आहेत. काव्याची परिपाठी देऊन जुन्या काव्यव्यवस्थेने वाचकांची सोय केलेली आहे तर नव्या कवितेने काव्यनियमांची अडगळ बाजूस सारली आहे !

काव्याचीं मूल्यें कालक्रमानुसार बदलत जातात हें, ऐतिहासिक अपरिहार्यतेचा सिद्धांत गृहीत धरला तर,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मान्य करावें लागतें. पण हें परिवर्तन पूर्णपणें नियतिसिद्ध नसतें. बदललेली समाजस्थिति व व्यक्तिगत कर्तृत्व यांचा हा परिपाक आहे. कोणत्याहि तत्त्वज्ञानाचा ठोकळेबाजपणा अथवा काटेकोरपणा वाङ्मयकलेवर लादल्यास हास्यास्पद विचारप्रणालीखेरीज दुसरा लाभ होणार नाही. श्री. दि. के. वेडेकरांनी मर्ढेकरांच्या कवितेंतून मध्यमवर्गीयांची संज्ञा दाखवून देण्याचें जें आग्रहपूर्वक प्रतिपादन कलेलें आहे तें या ठिकाणीं लक्ष्य आहे. (नवकाव्याची विफलता—दि. के. बेडेकर, सत्यकथा १९५०)

विषय व विषयपद्धति यांच्या पुनर्रचनेचे प्रयोग साहित्याच्या संधिकाळापासून होत आहेत. अभिव्यक्तीच्या नाविन्याची आवड हा मनुष्यप्रवृत्तीचा उपजत गुणधर्म आहे. सामाजिक व सांस्कृतिक संबंध वाढल्यामुळे वैचारिक जीवनांतहि उत्क्रांति होत रहाणें हा निसर्ग–नियम आहे. वाङ्मयांतून हे पडसाद अधिक तीव्रतेने उमटणें ही वस्तुस्थिति अनिवार्य होय. मानवांच्या मूलभूत प्रश्नांना जागतिक स्वरूप आलेलें आहे. समाजाचे आर्थिक व राजकीय संबंध अधिकाधिक दृढ होत असतांना वाङ्मयाने तेवढें अलिप्त असावें ही विचारसरणी विनवुडाची आहे. या परिस्थितीची प्रतिक्रिया वाङ्मयांतून झालेली असून समाजांतील नव्या आशयाच्या खुणा साहित्यांतून दिसूं लागल्या आहेत.

वाङ्मयांत एक प्रवृत्ति स्थिर झाली म्हणजे तिचें 'तंत्र' बनतें. गतिमानता हा जसा मानवी जीवनाचा प्राण आहे तसाच तो साहित्याचाहि आहे. साहित्याचें तंत्र झालें म्हणजे तेंहि निर्जीव, कृत्रिम व परिणामशून्य होतें. म्हणून तंत्रावरील भक्तीचें पर्यवसान 'तंत्रद्रोहांत' होतें. या तंत्रद्रोहांतून काव्यांतील नव्या प्रक्रियेचा उद्भव झालेला आहे.

प्रतीकात्मक अभिव्यक्ति नाट्यीकरण नव्हे !

काव्यांतील नवा आशय नव्या प्रतीकांच्या द्वारें व्यक्त होऊं लागला आहे. यंत्रयुगीन जीवनाला अनुरूप अशा प्रतीकांचा कवीने काव्यांतून पुरस्कार केलेला आहे. त्यामुळे भावाभिव्यक्तीस साह्य तर होतेंच व त्याचबरोबर व्यंजनेचें सौंदर्यहि प्रतीत होतें. प्रतिमा व प्रतीकें यांच्या नाविन्यावरून कवीचें कल्पनाकौशल्य प्रगट होतें. व कवीच्या कल्पकतेचा खराखुरा विलास स्पष्ट होतो.

पण प्रतीक म्हणजे नाट्य नव्हे, रूपक नव्हे, किंवा अन्योक्ति नव्हे. प्रतीकें अलंकाराच्या प्रकारभेदांतून निर्माण होत नाहीत, तीं आत्मनिष्ठ असतात. अलंकार हीं काव्यशास्त्राचीं वस्तुनिष्ठ भूषणें होत ! सुप्रसिद्ध कवि यशवंत यांनी एका लेखांत (कवीची प्रकृति आणि कवितेची प्रक्रिया—य. दि. पेंढारकर—नवभारत, फेब्रुवारी १९५०.) वेगळीच विचारसरणी मांडली आहे. ते म्हणतात–– "आशयाची प्रतीकात्मक अभिव्यक्ति म्हणजे सत्य प्रतीतीचें सूक्ष्म विचाराने नाट्यीकरणच होय. हें नाट्यीकरण प्रतीकरूप कवितेच्या जन्मकाळीं प्रतिभेच्या तडित्स्फुरणाने झालेलें असतें...... .." नाट्यीकरणांत दुसऱ्या व्यक्तीच्या अनुभूती रूपांतरित केलेल्या असतात. एखादा नाट्यप्रसंग अथवा नाट्यानुभूति असल्याखेरीज नाट्यीकरण होणार नाही. प्रतीक कसें निवडलें जातें हें दाखविण्याकरितां यशवंतांनी कवि माधव ज्यूलियनांच्या फर्ग्युसन कॉलेजावरील एका कवितेचा उल्लेख केलेला आहे. या कवितेची रचनाच रूपकात्मक असून प्रियकर व प्रेयसीच्या रूपकांच्या आधारें कवीने आपलें मनोगत प्रगट केलेलें आहे. या कवितेंत 'नाट्यीकरण' कां व कसें झालें याचा उलगडा होत नाही. प्रेयसी, प्रेमिक यांचा संबंध झाला यामुळें 'नाट्यीकरण' आलें असेंहि म्हणतां येत नाहीं. दुसऱ्या व्यक्तीचें मनोगत—स्वतःचें नव्हे—स्वतःचें समजून काव्यांतून विशद करणें ही नाट्यीकरणाची पद्धति होय. शैवालाने पुरतेपणीं व्यापून टाकलेल्या 'विहिरीच्या गाण्यांत' नाट्यीकरण आलें आहे. तसेंच माधव ज्यूलियनांच्या 'सर्वं खल्विदं माया' या गीतांत नाट्यीकरण आहे. येथे रेंदाळकरांच्या अनुभूति नाट्यात्मक रीतीने माधव ज्यूलियन यांनी परिष्कृत केलेल्या आहेत. या कवितांतून रंगविलेल्या मध्यवर्ती अनुभूतीच हेत्वाभासमूलक (Fallacious) आहेत.

प्रतीकांची उपयोजना आशयाच्या व्यक्तीकरणाकरितां झालेली असते. त्यामुळे उपमेय-उपमान यांचा अन्योन्य संबंध त्यांत अभिप्रेत नसतो. प्रतीकें व रूपकें यांचा केवळ सदृश्यापुरताच संबंध

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. प्रतीकें हीं अर्थसूचक व्यंजनेंतून स्फुरलेलीं असतात तर रूपकें प्राय: अर्थस्पष्टीकरणात्मक असतात. प्रतीकांना रूपकें न म्हणतां 'साहित्य शास्त्रीय परिभाषे'-प्रमाणे 'रूपकातिशयोक्तीची योजना' असें प्रा. रा. श्री. जोगांनी म्हटलें आहे. ('आजच्या ललितवाङ्मयापुढील समस्या'—केसरी, ७ दिसेंबर १९५२) त्यांतील मथितार्थ ध्यानांत आणला तर प्रतीकांना नाट्यीकरण अथवा रूपक मानणें अयथार्थ आहे असें वाटूं लागतें.

आशयनिष्ठ आत्मप्रगटीकरण

नव्या कवितेने जुन्या काव्यपद्धतींतील कांही संकेतांकडे दुर्लक्ष केलेलें आहे. अभिव्यक्तिसौंदर्याची प्रथा कवितेंत वरीच बळावली होती. व काव्यमोहिनीचा गोडवा रसिकमनांवर दीर्घ काळ रेंगाळत होता. पूर्वी कवितेंतील अभिव्यक्ति 'कलानिष्ठ' असे तर आता 'आशयनिष्ठ' बनत आहे. कवीची मूल प्रेरणा कलामूलक व सौंदर्यमूलक असे तर आता वस्तुमूलक व आशयमूलक होऊं लागली आहे. सरलता, सुगमता व संवादिता या काव्यगुणांऐवजी दुर्बोधता व विरूपता यांचा प्रादुर्भाव होत आहे. अभिव्यक्तीचे नियम झुगारण्यांत आल्यामुळे 'आविष्काराचें अराजक' वाढत आहे.

केशवसुत हे आशयनिष्ठ कवि असल्यामुळेच प्रा. वसंत कानेटकर यांनी त्यांची नवकवींत गणना केलेली आहे. 'नवकाव्याचें सामर्थ्य' हा त्यांचा लेख (अभिरुचि, जानेवारी १९५३) मननीय आहे. 'झपूर्झा', 'हरपलें श्रेय' इत्यादि कवितांत आशयाला प्राधान्य आहे हें खरें आहे; पण त्या सुप्रसिद्ध कवितांतील गूढवादी वातावरणच विशेष लक्षांत येतें. मर्ढेकरांच्या कवितेंत 'आत्मशोधनाची व आत्मविकासाची धडपड' असून तुकारामांप्रमाणेच ते 'मुक्तिवादी' असल्याचा निर्वाळा प्रा. कानेटकरांनी दिलेला आहे. मर्ढेकर 'वैचारिक विप्लवाच्या कर्दमांत' अडकले आहेत या विधानाची वरील युक्तिवादावरोवर संगति जुळविणें चमत्कृतिपूर्ण आहे. 'घडलेल्या गोष्टी विसरून' नव्या कल्पनांच्या स्वागताकरितां सिद्ध होण्याचा पुरोगामी संदेश मर्ढेकरांनी दिला आहे. नव्या आशयाची धडपड व नव्या अनुभूतींचें स्पंदन खालील ओळींतून कसें व्यक्त होतें तें पहा.—

वेकंवेचे तेच परोचे;
जुनीच भाषा, नवे भरोसे
जुन्या कल्पना, नवीं तर्पणें
तींच गिरमिटें, नवीन वळसे !

कवितेंत सामाजिक जाणिवाच आहेत, वैयक्तिक असहायतेची रुखरुख आहे. कालगतीच्या उद्दामतेपुढे अशरणतेचें गाऱ्हाणें आहे. 'भाल भरडीत, कोटिक्षण विशाल काल चालला असतांना' येथे सारी कृति दिसते आहे व ओल्या ओठावर रिती आठवण राहणें 'ही एकच विकृति' आढळांत येते. येथे 'साराच भाव' असतांना 'डोळयांतील डाव डोळा नेणें' हा एकच अभाव प्रतीतीला येतो. मी निशिदिन माझें अज्ञान प्यालों आहें, आता 'तुझी कोरडी तहान' तेवढी मला लागली आहे !

नवीं प्रतिमाचित्रें

पूर्वीच्या कवितेंत मानवी भावना यंत्राप्रमाणे राववून घेण्यांत येत. त्यामुळे अलंकारादि जुन्या काव्य-कल्पनांची उसनवारीहि वरीच असे. कवीच्या मनांत एखादी संज्ञा चाळविली की तिच्या मागाहून असंख्य भावच्छटा हळुवारपणे जाग्या होतात. जागृत अनुभूतीच्या मागून लाजरे संज्ञातरंग चोर पावलांनी आंत प्रवेश करूं लागतात. नव्या कवितेंत अनुभूतींशी साहचर्य असणाऱ्या प्रतिमांना अधिक महत्व आहे. घटनेच्या अनुभूतीचा तोंडवळा, नेणिवेंतील एखाद्या अनुभूति-तथ्याशीं जुळत असल्यास तें प्रतिमारूपाने तरळून येतें.' मानवी अनुभूतीच्या तुकड्याला अंतर्मनांतील अवोध अनुभूती संलग्न असल्या म्हणजे दोन्ही अनुभूतींची प्रतीति परस्परपोषक होते. मूळ अनुभूति व तिच्याशी संलग्न अनुभूती यांनाच मर्ढेकरांनी प्रत्यक्ष व अध्याहृत पद मानलें आहे व त्यावरूनच कवि व अकवि यांमधील भेद स्पष्ट केलेला आहे. मर्ढेकरांची ही विचारसरणी टीकाविषय झाली आहे. 'भावनानिष्ठ समतानतें'तील उणीवा मुक्तिबोधांनी दाखविल्या आहेत. त्यावरून दोन पदांच्या जोडयांवर एखादा काव्यविषयक सिद्धांत प्रस्थापित करण्याचें वैयर्थ्य सिद्ध होतें.

प्रतिमांच्या अभिनवतेवर काव्याची मदार आहे. प्रतिमा हें काव्याचें सर्वस्व मानण्यांत येतें. प्रतिमांची

(पुढील मजकूर पान २१ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाकाटकांच्या राजधानीचीं शहरें

लेखक—सदाशिवराव काकडे, बी. ए., एलएल. बी.

गोंडवन प्रदेशावर प्राचीन काळीं वाकाटकांचें राज्य होतें, इतकेंच नव्हे तर वाकाटकांच्या राजधानीचीं शहरेंहि गोंडवन प्रदेशांतच होतीं. अगदी सुरुवातीला राजधानी नन्दिवर्धनपुर येथे होती ती पुढे प्रवरसेन राजाने प्रवरपुर नांवाचें नवीन शहर वसवून तेथे नेली. संशोधकांचें असें मत आहे की मध्यप्रदेशांतील 'रामटेक' नांवाच्या क्षेत्रापासून जवळच असलेलें नगरधन नांवाचें गाव हेंच पूर्वीचें नन्दिवर्धनपुर असावें. त्याचप्रमाणे वर्धा शहराजवळील पवनार हेंच वाकाटकांचें प्रवरपुर असावें. परंतु नन्दिवर्धनाचें नगरधन किंवा प्रवरपुराचें पवनार कसें झालें हें सांगतां येणें कठीण आहे. त्यामुळे संशोधकांचें वरील मत ग्राह्य मानतां येत नाही.

राजधानीकरिता नवीन शहर वसविल्यानंतर राजाला आणि राज्ययंत्र चालविणाऱ्या सर्व लोकांना व राजाश्रित मंडळीला, राजधानीचें जुनें शहर सोडून त्या नवीन शहरांत जाणें भाग पडतें; परंतु ही सर्व मंडळी आपलें गाव सोडून फार लांब जाण्याकरिता केव्हांहि नाखुषच असणार म्हणून राजधानीकरिता नवीन शहर तयार करण्यांत आलें तरी तें राजधानीच्या जुन्या शहरापासून चार सहा मैलांच्या अंतरावरच वसविलें जाईल. या दृष्टीने विचार करितांहि नगरधन आणि पवनार हीं वाकाटकांच्या राजधानीचीं शहरें असतील असें वाटत नाही.

प्रवरसेनानें नवीन शहर वसवून त्याचें नांव प्रवरपुर ठेवलें. प्रवरपुर याचा अर्थ संस्कृत भाषेंत मोठें वरपुर असा होतो. परंतु वाकाटकांची राजसत्ता नष्ट झाल्यावर प्रवरपुर हें राजधानीचें शहर राहिलें नाही व म्हणून त्याचा मोठेपणाहि अस्तंगत झाला. त्यामुळे वाकाटकानंतर प्रवरपुराला वरपुर ही संज्ञा सयुक्तिक तशीच संभवनीयहि आहे. तसें असल्यास वाकाटकांचें प्रवरपुर कोठे होतें व त्याचें हल्लीचें नांव काय आहे हें सांगतां येणें शक्य आहे. कारण वरपुर हा संस्कृत शब्द प्राकृत भाषेच्या प्रचारानंतर अपभ्रष्ट होऊन हल्लीचें रूप त्याला मिळालें असेल. संस्कृत शब्द प्राकृत भाषेंत जातांना त्याच्यांतील क आणि प या व्यंजनांचा लोप होत असतो. या सामान्य नियमाला अनुसरून वरपुर याचे वरउर म्हणजे वरूर किंवा वरोर अशीं रूपें होतात. वरोरा या नांवाचा एक गांव मध्यप्रदेशांत चांदा जिल्ह्यांतील एका तहसिलीचें सदर ठिकाण म्हणून हल्ली प्रसिद्ध आहे. हा गाव वाकाटकांचें प्रवरपुर असावा असें आमचें मत आहे.

हल्लीचें 'वरोरा' हें गांव जर पूर्वीचें प्रवरपुर असेल तर येथून चार सहा मैलांवर नन्दिवर्धनपुरहि असलें पाहिजे, तरी तें कोठें आहे तें दाखवा असें विचारलें जाण्याचा संभव आहे. म्हणून सांगतों की, वरोऱ्यापासून चार मैलांचे अंतरावर नंदोरी म्हणून एक गांव आहे. त्याचें पूर्वीचें नांव नन्दपुरी असेंच असलें पाहिजे. वर दिलेल्या नियमाप्रमाणें 'प' चा लोप होऊन नन्दपुरी नन्दउरी, नंदोरी, असें नांव बनत गेलें. नन्दिवर्धन हें नांव सामान्य लोकांच्या दृष्टीने उच्चारसुलभ नसल्यामुळे त्या गावाला सामान्य व्यवहारांत नन्दपुरी असें म्हणत असतील. तसें असल्यास हल्लीचें नंदोरी गावच प्राचीन नन्दिवर्धनपुर असावें असें म्हणतां येईल.

परंतु प्रवरपुरांतील 'प्र' कालांतराने गळला आणि नन्दिवर्धनाचें दुसरें नांव नन्दपुरी असें होतें ह्या निव्वळ कल्पना होत. या कल्पनांशिवाय हीं दोन्ही गावें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजधानीचीं शहरें होतीं, हें सिद्ध करण्याकरितां दुसरा ऐतिहासिक आधार कांहीच नाही, अशा तऱ्हेचा एक आक्षेप वरील विवेचनावर येण्याचा संभव आहे. व तो आक्षेप आजच्या परिस्थितींत खंडन करतां येणार नाही. तथापि वरील दोन गावें—नंदोरी आणि वरोरा—हीं राजधानीचीं शहरें होतीं असें जेणेंकरून मानतां येईल अशा दुसऱ्याहि कांही गोष्टी आहेत. त्या लक्षांत घेतां वरील विवेचनाची सयुक्तिकता कोणासहि पटेल असें वाटतें.

वरोरा या गावाच्या एका भागाला 'किल्ला' हें नांव आहे आणि हा भाग बऱ्याच उंच जागेवर वसलेला आहे. त्यामुळे या उंच जागेभोंवतीं पूर्वी किल्ला असला पाहिजे हें उघड आहे; परंतु ज्या अर्थी त्या किल्ल्याची एक वीट किंवा एक दगड सुद्धा हल्ली दृष्टीस पडत नाही त्याअर्थी तो किल्ला पडून हजारपांचशें वर्षें लोटलीं असावींत.

वरोडा आणि नंदोरी या दोन्ही गावांचीं नांवें एकेकाळीं शुद्ध संस्कृत भाषेंत होतीं तीं पुढे अपभ्रष्ट होऊन हल्लीचीं नांवें प्रचारांत आलीं त्यामुळे हीं दोन्ही गावें अस्तित्वांत येऊन हजार दीडहजार वर्षें झालीं असावीं असें वाटतें.

नंदोरी या गावांत एक फार जुनें घराणें असून त्याचें उपनांव 'राजपुरोहित' असें आहे आणि वरोरा येथे अशाच एका ब्राह्मण घराण्याचें उपनांव दुर्गपुरोहित असें आहे. हीं दोन्ही घराणीं एकाच कण्वशाखेचीं आहेत, ही एक फार महत्त्वाची गोष्ट आहे.

वरोरा येथील किल्ला या भागाच्या सभोंवती पूर्वी जंगल असून लोकवस्ती किल्ल्यापासून बरीच लांब होती असें वृद्ध लोक सांगत असत. किल्ल्यापासून दोन मैलांवर चिमूरकडे जाणाऱ्या सडकेवर 'मोरयंव' नांवाचें एक ठिकाण आहे. मोरयंव हा शब्द संस्कृत भाषेंतील मयूरस्तंभ या शब्दाचें अपभ्रष्ट रूप आहे. हा मयूरस्तंभ वस्तीच्या मध्यभागीं असावा, व लोकवस्ती या मयूरस्तंभाच्या चारहि बाजूला पसरलेली असावी असें वाटतें.

नंदोरी गाव हल्ली खेडें असला तरी पूर्वी तो फार मोठा गाव असावा. तेथील लोक गाव सोडून निघून गेल्यावर दोन टोकाला थोडी थोडी लोकवस्ती शिल्लक राहिली व या टोकांत मैलदीड मैलाचें अंतर पडलें. परंतु या दोन्ही टोकांवरील लोकवस्तीला नांव नंदोरी हेंच चालू राहिलें. त्यामुळे होणारा घोटाळा टाळण्याकरितां पुढे एका वस्तीला 'मोठी नंदोरी' व दुसऱ्या टोकाच्या वस्तीला 'छोटी नंदोरी' अशीं नांवें देण्यांत आलीं. या दोन्ही नंदोरींच्या परिसरांत हिंडणाऱ्या संशोधकाला या ठिकाणीं पूर्वी फार मोठें नगर असल्याची तत्काळ खात्री पटते.

नंदोरी आणि वरोडा हीं दोन गावेंच वाकाटकांच्या राजधानीचीं प्राचीन शहरें होत असें आम्हांस ज्या कारणांवरून वाटतें तीं कारणें वर दिलीं आहेत. त्या कारणांच्या युक्तायुक्ततेबद्दल संशोधकांनी विचार करावा अशी विनंति आहे.

कवितेची नवी प्रक्रिया (पान १९ वरून)

नाविन्यपूर्ण मांडणी हें नवकाव्याचें व्यवच्छेदक लक्षण मानण्यांत येतें. कवीच्या अनुभूतीच्या विशाल आशयांतून सरस व सुंदर प्रतिमांची निर्मित होते. नवकवींच्या कवितांतून रमणीय प्रतिमांची वैशिष्ट्यपूर्ण योजना झालेली असते. य. द. भावे, मुक्तिबोध व ग्रामोपाध्ये यांच्या कवितांतून प्रतिमासौंदर्याचा आविष्कार झालेला आहे.

केशवसुतांच्या कित्येक कवितांत प्रतिमांचा विलास दृग्गोचर होतो. 'अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न' या कवितेंतील प्रतिमांचें मूलग्राही विश्लेषण श्री. आ. रा. देशपांडे यांनी 'काव्य आणि क्रांति' या लेखांत केलेलें आहे. त्यावरूनहि जुन्या कवींना प्रतिमांचें वावडें नव्हतें हें दिसतें.

नवकविता हा मराठी काव्याचा नवा पैलू आहे. मराठी काव्यप्रक्रियेंतील बदलाचें तें एक प्रतीक आहे. मराठी कविता विशिष्ट वळणाजवळ स्थिर झालेली होती. ती प्रवाही व प्रगतिशाली होत आहे. नव्या दिशेने तिने आता वाटचाल सुरू केलेली आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गद्यकाव्य

अहंकार

—सुरेश डोळके

ब्रह्मदेवाला
त्याच्या मूळ स्थितींत
आनंदच होईना.
म्हणून—
त्यानं आपली स्वप्नमंजूषा उघडली.
आणि एक नवा प्रयोग करायचं ठरविलं.
प्रयोगशाळेंत बसून त्यानं पंचमहाभूतांचा अर्क काढला.
त्याची एक मूर्ति तयार केली.
स्वतःच्या प्राणांची फुंक मारून—
त्यानं तिला सजीव केलं
आणि नांव दिलं—मानव.
स्वतःच्याच मूर्तीकडे तो अभिमानानं पाहत राहिला.

* *

मानवाला ओवाळण्याकरिता
त्यानं निरांजनांचं ताट आणलं.
पण मानवानं
त्यांतलीं नीरांजनं उधळून लावलीं—उंच. आकाशांत.
त्यांतलीं रत्नं भिरकावून दिलीं—दूर. सागराच्या तळाशी.
त्यांतलीं फुलं विखरून टाकलीं—सृष्टीच्या रंगमंदिरांत.
आणि स्वतःच्या डोळ्यांतील नीरांजनांच्या प्रकाशांत
आत्म्यालाच रत्न मानून
भाव-पुष्पांच्या सुगंधानं बेहोष होऊन
ईश्वराच्याहि पलीकडलं स्थान
प्राप्त करून घेतलं.

* *

ईश्वरानं अमृताचा कुंभ पाठविला.
पण मानवानं तो लाथाडला
आणि हलाहल प्राशन केलं.
—त्याच 'मर्त्य' मानवानं
ईश्वराला बंदिवान् केलं,
त्याला 'अमर' बनविलं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समालोचन

'नवभारत'—कैलासम् विशेषांक : सप्टेंबर १९५३

उच्च अभिरुचीचें गंभीर ललित साहित्य पुरवणाऱ्या 'नवभारता'स सहा वर्षें पूर्ण झालीं असून अर्धें तपभर स्वतः तापून दुसऱ्यांना उच्च आनंदाची प्राप्ति करून देण्याचें प्रशंसनीय कार्य या मासिकाच्या ध्येयवादी संपादकांनी चालविलें यावद्दल अभिमान वाटतो. या अंकांत आधुनिक भारताचे एक विख्यात कन्नड साहित्यिक टी. पी. कैलासम् (१८८५–१९४६) यांचें वाङ्मय व व्यक्तिमत्व यांवर विविध लेख असून त्यांच्या The purpose या नाटिकेचा मराठी अनुवाद श्री. के. नारायण काळे यांनी केलेला छापला आहे. ही नाटिका वाचतांच आपणाला एका प्रतिभासंपन्न नाटककाराच्या निर्माणक्षमतेचा परिचय होतो. व एकलव्याच्या महाभारतीय कथेचा किती नाटचकुशल उपयोग कैलासम् यांनी करून ही श्रेष्ठ कलाकृति निर्माण केली आहे याचाहि प्रत्यय येतो. कैलासम् सारख्या एका कानडी-भाषी साहित्यिकासंबंधी मराठींत लेख मिळवून व त्यांच्या एका प्रसिद्ध नाटिकेचें भाषांतर करवून प्रकाशित करणें हें काम किती जिकिरीचें असतें 'हें अनुभवाची जोगें' हें तर खरेंच; परंतु हें काम 'नवभारता'ने यशस्वी रीतीने केलें आहे. एवढेंच नाही तर "प्रयोजन" हें मराठी रूपांतर वाङ्मयाचें लेणें होऊन बसेल इतक्या वरच्या दर्ज्याचें आहे, ही विशेष गोष्ट आहे. "अव्यभिचारी निष्ठा आणि एकाग्रतेने केलेला पुरुषप्रयत्न यांचें सामर्थ्य किती प्रचंड आहे हें या नाटकाच्या द्वारें दाखवून श्री. कैलासम् यांनी निश्चित ध्येयाच्या अभावीं वाहवत जाणाऱ्या...आधुनिक भारतीयांच्या पुढे एक आदर्श ठेवला आहे" हे डॉ. सर सी. आर्. रेड्डी यांचे उद्गार मननीय आहेत. मानवी कृतीच्या हेतूमागे जी उदात्त नैतिक प्रेरणा हवी आहे तिचें विरोधी चित्रण अर्जुन एकलव्य या द्रोणशिष्यांच्या संघर्षांतून चितारलें असून 'प्रयोजना'चा निकष अर्जुन एकलव्याप्रमाणेच द्रोणभीष्मांनाहि कसा लागू पडतो यांतच नाटककाराच्या प्रतिभेचें वैशिष्टच दिसून येतें. प्रा. द. रा. वेंद्रे यांनी दिलेल्या माहितीनुसार इतरहि कांही कानडी नाटककारांनी एकलव्य अख्यानाचा नाटचोचित उपयोग करून घेतलेला आहे. परंतु जीवन–जिज्ञासा आणि नाटचकला–जिज्ञासा यांतून येणारी ध्येयदृष्टि 'प्रयोजनां'त जशी ध्वनित होते तशी आयोजना इतरांना साधली नाही. तुमच्या–आमच्या सारख्या सर्वसामान्य वाचकांना मात्र श्री. कैलासम् यांनी नाटकांतील खरा संघर्ष हा सवर्ण–अवर्ण यांच्या अधिकारावद्दल असून त्याला केवळ स्पर्श करून डावलला व नाटचप्रमेयाला मानवी कृतीच्या हेतू-मागील नैतिक भूमिकेचें वेगळेंच स्वरूप दिलें यावद्दल आश्चर्य वाटतें! परंतु जें कांही समोर आहे त्यामागील व्यक्ति व प्रेरणा प्रभावी असून कृती सरस-रमणीय आहे यावद्दल दुमत होत नाही. संस्कृत नाट्याचें रसात्मक तंत्र व ट्रॅजडी निर्मात्याची प्रतिभा यांचा मनोहर संगम येथे झाला असून जुन्यांतून निघालेली ही नवी निष्पत्ति श्रेयस्कारक आहे हें पाहून व तिचा लाभ कन्नड भगिनीकडून मराठीला मिळावा यांत मोठें औचित्य आहे असें वाटतें. मराठी लोकांच्या मनांत आपल्या साहित्यांतील नाटचावद्दल एक यथार्थ अभिमानस्थान आहे व जवळच्या भाषांतील श्रेष्ठ नाटचकृतींचा परिचय झाल्यास हें अभिमानस्थान झाडून पुसून स्वच्छ करितां येईल व आपण कोठे आहों याचा नक्की अदमास येईल, हेंहि नसें थोडकें.

'नवभारता'ने वैशिष्टचपूर्ण नाटचमय विशेषांक काढल्यावद्दल मनःपूर्वक अभिनंदन व त्यांचा पुढील मार्गहि अधिकाधिक यशाने उजळ होवो अशी हार्दिक सदिच्छा.

—माधव गोपाळ देशमुख

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कर्णकुन्ती संवाद आणि देवनागरी

आंतरभारती संस्थेने रवींद्रनाथ ठाकुरांच्या कर्ण-कुन्ती संवाद या नाटयकाव्याचा अनुवाद मूळ बंगाली रूपासह प्रकाशित केला आहे. अनुवादित भाग गद्य रूपांत आहे. अनुवादकर्ते स. ज. भागवत यांनी अनुवाद करतांना रविबाबूंच्या काव्यांतील शब्द बहुतांशीं राहूं दिलेले असल्यामुळे गद्यांतहि शब्दमाधुरी आणि शब्दसौंदर्य कायम आहे. या पुस्तिकेचें वैशिष्टय असें आहे की मूळ काव्य देवनागरी लिपींत मुद्रित झालेलें आहे.

कोणतीहि भाषा हस्तगत करतांना प्रथम लिपीचा डोंगर ओलांडावा लागतो. गोदावरीच्या उत्तरेकडील बहुतेक भाषा संस्कृतोद्भव. बहुतेक भाषांचें रूप सारखें, शब्दसंपत्तिहि तीच. पण असें असूनदेखील निरनिराळया भाषा अवगत करून घेण्याची प्रवृत्ति मात्र अत्यल्प. रविबाबूंचें काव्य आणि शरदबाबूंची कादंबरी मूळांतून वाचण्याची इच्छा रसिक अंतःकरणांत बाळगून असे. परंतु बहुतेकांची गत अशी व्हायची की लिपी हस्तगत करतांकरतां भाषा शिकण्याची उर्मी ओसरत जायची. अपरिचित भाषा बोलतां बोलतां येते, ऐकतां ऐकतां येते, वाचतांवाचतां येते. पण पहिले दोन प्रकार सगळयां-च्याच आटोक्यांत असतील अशांतला भाग नाही. परंतु तिसऱ्या प्रकाराच्या बाबतींत मात्र, निश्चितपणें असें म्हणतां येईल, की कर्ण-कुन्ती-संवाद सारखे, मूळ देवनागरी लिपींत देऊन, अनुवाद प्रसिद्ध झाले तर वाचतांवाचतां भाषा हस्तगत होऊं शकेल. याच दृष्टीने स. ज. भागवतांनी आंतरभारतीतर्फे प्रकाशिलेल्या या अनुवादाला महत्त्व आहे.

श्री. भागवतांनी या प्रकारचें साहित्य प्रकाशित करायला आरंभ केला तो रविबाबूंच्या कर्ण–कुन्ती–संवादाने. निवड अतिशय चांगली झाली. भाषेचें ज्ञान करून घ्यायची इच्छा असो अथवा नसो, तें काव्य अत्यंत हृदयंगम असल्यामुळे वाचकाच्या अंतःकरणावर मात करूं शकतें. पांडवांचा निःपात करण्याची घनघोर प्रतिज्ञा कर्णाने केलेली. पुत्रांना जीवदान मिळावें म्हणून याचना करण्याकरिता कुन्ती कर्णाकडे आली. कुन्तीने कर्णाला "विधात्याचा अधिकार घेऊनच एक दिवस तूं या माझ्या अंकावर आला होतास" या शब्दांनी, आपण स्वतःच त्याची माता असल्याचें सांगितलें. जेव्हा जेव्हा कर्णाला, कुन्तीने टाकून दिल्यामुळे खाली पाहण्याचा प्रसंग आला, त्याचा पाणउतारा झाला तेव्हा तेव्हा तिचें मातृहृदय कसें व्यथित झालें याचें करुण वर्णन तिने केलें. कर्णाचेंहि अंतःकरण हळुवार झालें, द्रवलें, पण कौरवांचा पक्ष सोडून कुन्तीबरोबर पांडवांकडे जाण्याइतपत त्याने तें भ्रष्ट होऊं दिलें नाही. दोन्ही भूमिका शेवटपर्यंत उदात्त राहिल्या. "तुझे पुत्र पांडव विजयी होवोत, राजे होवोत" या बोलांनी तिचें चित्त शांत केलें. आणि नंतर तिच्या-जवळून कर्णाने आशीर्वाद मागितला, "जयलोभानें, यशोलोभाने, राज्यलोभानें, वीराच्या सद्गतीपासून तूं भ्रष्ट होणार नाहीस."

विषय, भावना आणि नाटय या तिन्हींचा परस्परानुकूल परिपोष या नाटयकाव्यांत झालेला असल्यामुळे तें अत्यंत हृदयंगम झालें आहे. आणि या हृदयंगमतेंत श्री. भागवतांच्या प्रयत्नाची यशस्विता आहे.

जो उपक्रम आंतरभारतीने केला तोच संसदीय हिन्दी परिषदेनेहि आरंभिला आहे. उपक्रम 'देवनागर' या द्वैमासिकाच्या अन्वयाने होणार आहे. द्वैमासिकाचे संरक्षक डॉ. राजेन्द्रप्रसाद आहेत. संपादक डॉ. नगेन्द्र आणि श्री. सच्चिदानन्द हीरानन्द वात्सायन आहेत. संपादक मंडळांत, साहित्याविषयी अज्ञान असलेले, मराठी साहित्यकारांविषयी आणि मराठी आकांक्षां-विषयी सहानुभूती नसलेले, 'काकासाहब कालेलकर' मराठीचें प्रतिनिधिपद सुशोभित करीत आहेत.

ज्यांच्याद्वारें सगळया भारतीय भाषांचें संमेलन होऊन, परस्परांमध्ये आदान प्रदान होऊं शकेल, अशा माध्यमाची अत्यंत आवश्यकता होती. 'देवनागर'च्या रूपाने तें माध्यम निर्माण झालें आहे. देवनागरचा 'दृष्टिकोण एकान्त साहित्यिक' आहे. 'देवनागर, निर्माण करण्यांतील उद्देश थोर आहे. देवनागरच्या पाठीशीं संसदीय हिन्दी परिषद आहे. एका मोठ्या यंत्रणेचें तिला पाठबळ आहे. ही यंत्रणा देवनागराकडून सांस्कृतिक ऐक्याचेंहि कार्य करून घेऊं शकते, आणि त्याचप्रमाणे परस्परांमध्ये विघातहि निर्माण करूं शकते. कार्य अत्यंत थोर आहे; तसेंच नाजुक आहे. या थोर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि नाजुक कार्यांत संसदीय हिन्दी परिषद आणि 'देवनागर' यशस्वी होवो ही हार्दिक आशा. ती आशा फलद्रूप होऊं शकेल, जर सगळे भाषिक 'देवनागर'च्या कार्याकडे डोळसपणें वघत राहिले तर, नाहीतर महाकवि निराला यांच्या 'भारती-वन्दना' सारख्या कवितेचा भारताला परिचय करून देतांना पानेंच नुसतीं खर्ची पडायचीं काव्य लाभायचें नाही.

—गो. रा. दो.

पांच नाटिका (लेखक : गंगाधर गाडगीळ, प्र. पॉप्युलर बुकडेपो, मुंबई, किं १॥ रुपया)

प्रसिद्ध कथालेखक श्री. गंगाधर गाडगीळ यांच्या नभोवाणीवरील पांच श्रुतिकांचा, हौशी मंडळींना रंगभूमीवर प्रयोग करण्यासाठी सोयीचें व्हावें, म्हणून प्रसिद्ध केलेला हा संग्रह आहे. लेखकाने या श्रुतिका गंमत म्हणून लिहिल्या व विनोदी म्हणून प्रसिद्ध केल्या आहेत. शब्दकोडयांचा छंद, रहस्यकथेचें वेड, मुंबईंतील जागेची टंचाई आणि त्यामुळे मध्यमवर्गीयांचें ओढग्रस्त झालेलें गृहजीवन या चटकदार मसाल्यावर नाटिकांतील विनोदाची उभारणी झालेली आहे. पण हा विनोद, आमच्या मतें, अट्टहासी आहे. प्रकाशक त्यालाच 'दिलखुलास व विक्षिप्त' म्हणतात. त्यामुळे अधिक चिकित्सा करण्याचें कारण उरत नाही. गाडगीळ नवकथाकार आहेत. नवकथेंतील लेखकी निरूपणाची भुलावण बाजूला सारली आणि केवळ नाटिकारूप वाङ्मयांतील संवादांतलें जीवनसत्त्व शोधायला लागलें तर चमत्कार दृष्टीस पडतो. तो चमत्कार असा. जुन्या वाङ्मयांत विनोदाचा आधार 'विसंगति व अतिशयोक्ति' असा मानला जाई. नवकथेने वाङ्मयाचीं मूल्यें बदललीं आहेत असें म्हणतात. या नाटिकांतील विनोदाचा आधार 'अतिरंजन—वालिश, अवास्तव व विकृत अतिरंजन' हा आहे. पण हा लेखकाचा स्थायीभाव मानणें चूक होईल, असें वाटतें. कारण ही त्यांची 'गंमत' आहे; आत्मरंजन आहे. पण सार्वजनिक जागेवर असली 'गंमत' केल्याने हें सारें लिहिणें भाग पडत आहे. श्री. गाडगीळांना हा विसंगत सूर कदाचित आवडायचा नाही. पण पुण्या-मुंबईकडील परीक्षण-प्रशंसेचीं केंद्रें कंपूगत केलेल्या लेखकांनी व टीकाकारांनी त्यामुळे बिचकून जाण्याचें कारण नाही. या पांच नाटिकांतील विनोदाच्या नवयुगनिर्मितीसंबंधी एखाद्या प्रचंड टीकालेखाचा नगारा पिटून आमची टिमकी सहज मिटविता येईल. आमच्या मतें मात्र ह्या नाटिका मुमार आहेत. आणि गमतीने लिहिलेलें गमतीने घ्यायचें म्हणून त्यांना श्रुतिका म्हणायचें इतकेंच !

—के के.

मराठी ग्रंथालयांचा इतिहास—(संपादक—ल. वा. पडोळे, पूजा प्रकाशन, धन्तोली, नागपूर १. मूल्य ५ रु.)

शिक्षण, कला, संस्कृति, ज्ञानविज्ञान आदि सर्व बाबतींत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने भारत बराच मागासलेला देश आहे. तसें पाहिलें तर अभिमानाने सांगतां येतील असे अनेक गुण भारताजवळ आहेत. पण हें धन पुरून ठेवल्यासारखें आहे. त्या धनाचा सर्व जनतेला लाभ व्हावा व तिचा दर्जा इतर राष्ट्रांपेक्षा कांही विशेष आहे, असें दर्शवावें, असा प्रयत्न करण्यांतहि भारत गुणानुक्रमें शेवटचा नंबर पटकावतो, हें कटुसत्य आहे. शिक्षणाचा सुधारलेल्या इतर राष्ट्रांपेक्षा प्रसार नाही, कलासंवर्धन नाही, सांस्कृतिक विकास नाही. 'मराठी ग्रंथालयाचा इतिहास' या ग्रंथांत विद्वज्जनांनी जे व्यासंगपूर्ण तौलनिक लेख लिहिले त्यावरून वरील विचार सहज डोकावतात आणि भारताच्या प्रगतीचा अंदाज लागून वैषम्यहि वाटतें.

या ग्रंथांत मुंबई सरकारचे डिरेक्टर ऑफ आर्काइव्हज, डॉ. पु. म. जोशी यांचा प्रस्तावनावजा 'ग्रंथालयांची ऐतिहासिक पार्श्वभूमि' हा अभ्यसनीय लेख आहे. लिखाणाला व ग्रंथनिर्मितीला कोणत्या राष्ट्रांतून कशी सुरुवात झाली, त्या त्या काळीं शास्त्रज्ञांनी कोणते कसे प्रयत्न केले व ग्रंथालयाचें महत्त्व काय याची संक्षिप्त पण विचारपरिप्लुत माहिती निवेदिली आहे. हिंदुस्थानाजवळ कला व सामुग्री असूनहि हिंदुस्थान जें करूं शकला नाही तें, हिंदुस्थानांतीलच साहित्याचा विदेशीयांनी कसा उपयोग केला यावेहि सुंदर दाखले या लेखांत दिले गेले आहेत. श्री. वसंत देवकुळे यांचाहि 'मुद्रणकलेची उत्पत्ति व विकास' हा लेख संशोधनपूर्ण आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वतंत्र भारताला ग्रंथालयांची किती आवश्यकता आहे हें कांही सांगायला नको. भारताचा प्रत्येक नागरिक सुशिक्षित व सुसंस्कृत होऊन त्याला आपल्या जबाबदारीचें पूर्ण ज्ञान व्हावें, यावरच राष्ट्राचा दर्जा अवलंबून आहे. यासाठी ग्रंथालयें किती तरी कार्य करूं शकतात. त्या दृष्टीनें श्री. त्र्यं. दि. वाकनीस, श्री. कृ. के. राहाळकर, श्री. दि. वि. काळे, श्री. ज. वा. बुधकर व श्री. के. ह. बोरगांवकर यांचे विविध दृष्टिकोनांतून मीमांसा करणारे लेख मोठे उपयुक्त आहेत. या लेखकांनी ग्रंथ व ग्रंथालयें यांचे बाबतींत कांही विधायक सूचनाहि केल्या आहेत. सरकारनें व त्याचप्रमाणे सार्वजनिक वाचनालयें यांनी त्या सूचनांचा राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें अवश्य उपयोग करायला पाहिजे.

श्री. के. ह. बोरगांवकर यांनी 'ग्रंथालयाचा कायदा' या आपल्या लेखांत भारतांत ग्रंथालयें कोणत्या प्रमाणांत आहेत हें आकडेवारीनें सांगून, इतर सुधारलेल्या राष्ट्रांतील कांही असे तुलनात्मक आंकडे दिले आहेत की त्यावरून भारत कितीतरी पटीनें मागासलेला आहे हें सिद्ध होतें. कांही बोलके आकडे असे :

प्रत्येक माणशी ग्रंथसंख्या—(१) नॉर्वे ३. (२) स्वीडन १½. (३) इंग्लंड ½. (४) अमेरिका ½. (५) हिंदुस्थान १/१०० पेक्षा कमी.

प्रत्येक माणशीं घरीं वाचावयास दिलेलीं पुस्तकें—(१) झेकोस्लोव्हाकिया १८ (२) डेनमार्क ५. (३) इंग्लंड ४. (४) जर्मनी १½. (६) हिंदुस्थान १/१००

ग्रंथालयांचा फायदा मिळणाऱ्या जनतेची शेंकडेवारी

(१) इंग्लंड–शें. ९९ टक्के ६०० ग्रंथालयांच्या द्वारें
(२) अमेरिका शें. ७३ टक्के ७०००
(३) पूर्ण हिंदुस्थान शें. ? टक्का „ ?

प्रत्येक माणशीं दरवर्षी ग्रंथालयावर होणारा खर्च

(१) इंग्लंड १ रु. (२) अमेरिका २ रु. (३) पूर्ण हिंदुस्थान एका पैचा कितवा हिस्सा ?

तेव्हा भारताच्या प्रगतीचें मापन सहज कळून येतें. डॉ. रंगनाथन् यांच्या Post war Reconstruction of Libraries in India' या पुस्तकावरून तर या बाबतींत प्रकर्षानें माहिती उपलब्ध होते.

दुसरें असें की, जीं ग्रंथालयें आपल्याकडे आहेत त्यांची दैनावस्था फार असून, सरकारचें तिकडे जावें तसें लक्ष गेलेलें नाही. ग्रंथसंपत्ति ही फार मौलिक असते व तिचें जपून जतन केलें पाहिजे ही साधी दृष्टीहि आमच्याकडील वाचकांना राखतां येत नाही. तसेंच वाचनालयांतील ग्रंथांचा अतिशय वाईट रीतीनें उपयोग करण्याची अनिष्ट प्रवृत्ति भारतीय वाचकवर्गांत बोकाळली आहे. या दृष्टीनेंहि प्रस्तुत ग्रंथांत प्रकाश पाडला आहे. ग्रंथालयांच्या चालकांनी आणि ग्रंथपालांनी ग्रंथालयांच्या प्रगतीसाठी काय उपाययोजना कराव्यात याची देखील दूरदृष्टीनें चिकित्सा केली गेली आहे. श्री. र. श. पारखी, श्री. वा. वि. भट, श्री. ना. वा. मराठे व श्री. पु. ग. ब्रम्हे यांचे ग्रंथालयें सुधारण्याच्या दृष्टीनें समाविष्ट करण्यांत आलेले लेख विशेष वाचनीय आहेत.

याशिवाय, संस्था परिचय, महाराष्ट्रांतील ग्रंथालयांचा परिचय, ग्रंथप्रकाशक, प्रमुख ग्रंथविक्रेते, ठिकठिकाणचीं ग्रंथालयें यांची अगदी व्यवस्थित भरगच्च माहिती 'मराठी ग्रंथालयांचा इतिहास' या ग्रंथाद्वारें मार्गदर्शनाच्या दृष्टीनें करून देण्यांत आली आहे. या ग्रंथाचे संपादक श्री. ल. वा. पडोळे यांनी बरेच परिश्रम घेऊन एक महत्त्वाचा उपयुक्त ग्रंथ वाचकांना सादर केला आहे, तो सरकारनेंहि पुरस्कृत करावा व ग्रंथालयें व वाचक यांनीहि संग्रही ठेवावा, अशीं सूचना आहे.

—ना. रा. शेंडे

ग्रंथव्यवहार : (लेखक अ. ह. लिमये; प्रकाशक— स. कृ. पाध्ये, व्हीनस बुक स्टॉल, अप्पा बळवंत चौक, पुणें २. मूल्य ३॥ रु.)

लेखकांनी ग्रंथनिर्मिति करावी, प्रकाशकांनी तीं पुस्तकें प्रकाशित करावीं व विक्रेत्यांनी तीं विकावीं; परंतु यासाठी कोणते निकष आहेत, लेखकांनी कोणत्या गोष्टींची दखल घ्यावी, प्रकाशकांनी कोणतें धोरण स्वीकारावयास पाहिजे आणि ग्रंथविक्रेत्यांनी कोणत्या तऱ्हेनें विक्री करावी या सर्व गोष्टींची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सप्रमाण, पद्धतशीर रीतीनें 'ग्रंथव्यवहार' या पुस्तकांत माहिती करून देण्यांत आली आहे. 'मराठी ग्रंथालयांचा इतिहास' या ग्रंथाप्रमाणेंच याहि पुस्तकाचें विशेष महत्त्व असून, ज्ञानांत एक वेगळी भर पडते, यांत शंका नाही.

मुद्रणकला कशी अस्तित्वांत आली व ग्रंथाद्वारें कोणते कसे व्यवहार साधले जातात याची जशी या पुस्तकांत माहिती ग्रथित करण्यांत आली; तशीच, लेखक व लेखन, प्रकाशक व प्रकाशन, मुद्रक व मुद्रण, आश्रय-दाता व विक्रेता, वाचक व वाचन आदि बाबींची समग्र सुंदर माहिती विवेचली गेली आहे. ग्रंथव्यवसाय म्हणून कोणत्या मार्गाचा कसा अवलंब केल्याने तो फलद्रूप होतो व मार्गांतील अडचणी दूर सारतां येतात याचें दाखल्यासह केलेलें विवेचन देखील मार्मिक वाटतें. आधुनिक काळाचा महिमा लक्षांत घेऊन, लेखकाने अभ्यासु वृत्तीने 'ग्रंथव्यवहार' या पुस्तकाची ग्रंथसंपत्तींत मोलाची भर घातली आहे. अर्थात् पुस्तक संग्राह्य आहे.

—ना. रा. शेंडे

जनता वेताळ अथवा पाकिस्तानवर स्वारी

आजच्या जगांत सहिष्णुतेचा संपूर्ण अभाव आहे. इतर माणसें, देशविशिष्ट प्रकारानेंच कां वागतात त्यांची वागणूक विरोधाची कां होते, हें समजण्याची व समजून घेण्याची पात्रताच आजच्या सर्वसामान्य व्यक्तीच्या ठिकाणीं नाही. आपल्या राष्ट्राने कोणताहि निर्णय घेतला, आक्रमक स्वरूपाचें युद्ध उभारलें, (ज्याच्यावर आक्रमण झालें त्या राष्ट्राची आगळीक इतकीच की त्या राष्ट्रालाहि जिवंत राहयची, सन्मा-नाने जगायची, आक्रमक राष्ट्राइतकीच प्रबळ इच्छा आहे.) तरीहि सगळा सदसद्विवेक बाजूला सारून माझ्याच देशाची बाजू धर्माची, देवाची म्हणून मानावें आणि दुसऱ्याच्या स्वातंत्र्य अपहरणाकरिता अस्तन्या साराव्या, सगळ्यांचें माथें भडकवावें, जनता वेताळ जागवावा, त्याला अत्याचाराला प्रवृत्त करावें, या प्रकारची वृत्ति आणि कृति इष्ट नाही, हें दाखवण्या-करिताच शि. गो. भाव्यांनी "जनतावेताळ अथवा पाकिस्तानवर स्वारी" या नाटकाची उभारणी केली आहे. पाकिस्तान जन्माला आल्यापासून, भारत स्वतंत्र झाल्यापासून 'पाकिस्तानवर स्वारी करा' अशा प्रका-रचा घोष अनेकदा भारतांत झाला. भाव्यांनी खरो-खरच स्वारी झाली आहे अशी पार्श्वभूमि आपल्या नाटकांत घेतली आहे. हिंदुस्थानांतील पाकिस्तान-विरोधी, मुसलमानविरोधी वर्ग युद्धाकरितां जीं कारणें पुढे करतो, तींच कारणें नाटकांतहि युद्धाला झालीं आहेत. परंतु या युद्धांतील निरर्थकता आणि निष्फळता तुकाराम वीर, या नाटकांतील नायकाच्या ध्यानांत येते आणि तो युद्धविरोधाची आणि सहिष्णुतेच्या प्रचाराची मोहिम आरंभतो, प्रयत्न करतो. परिणाम असा होतो की जनतेचा विरोध त्याला सहन करावा लागतो, जवळचे दूर होतात, प्रत्यक्ष पत्नी विभक्त होते, आणि दूरचे जिवावर उठतात, या संघर्षांतच त्याचा अपघाताने अंत होतो. ध्येयपूर्तीच्या प्रयत्नांत त्याला मरण येतें.

नाटकांतील प्रसंग, संघर्ष जरी काल्पनिक घटने-वर उभारला असला तरी त्या घटनेला वास्तवाचा आधार आहे. आपल्या देशांत आज ज्या घडामोडी होत आहेत, त्यांचें डोळसपणाने आकलन केलें तर भाव्यांच्या कल्पनासृष्टीचा अर्थ आपल्याला चटकन कळूं शकतो, आणि मग भाव्यांनी निर्माण केलेली पार्श्वभूमि किती सत्य आहे याची जाणीव होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी एक सिद्धांत ठेवला आहे. जी व्यक्ति सर्वसाधारण माणसाच्या भावनांना विरोध करील, मग ती कल्या-णाच्या हेतूने का करीना, प्रामाणिकपणे कां करीना ती जनतेला आपला वैरी वाटूं लागते. अनेक उच्च स्वार्थामुळे जनतेची दिशाभूल होऊन ती सत्प्रवृत्त व्यक्तीचा नाश करायला प्रवृत्त होते. व्यक्ति आणि जमाव यांच्यांतील संघर्षाचें चित्रीकरण नाटकाचें मूळ असल्यामुळे नाटकांतील कथावस्तूला भव्य स्वरूप आलें आहे.

परंतु भाव्यांची नाट्यशक्ति विषयाची विशा-लता पेलूं शकत नाही. संपूर्ण नाटक नुसत्या वादविवा-दावरच उभारलें गेलें आहे. सामान्य व्यक्ति या नात्याने तुकाराम वीर वावरतच नाही. या व्यक्तीच्या जीवनांत व्यक्तित्व आणि ध्येयवादित्व यांच्यांतील संघर्ष हा महान् असतो. आणि तो नीट रीतीने दाखवला गेला तरच महान् नाट्य निर्माण होतें, नाट्यविषयाचें मानवीकरण होतें. हॅम्लेट आणि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याच्या भोवतालचें जग यांच्यांतील विरोधापेक्षा हॅम्लेटच्याच मनांतील संघर्ष हा जास्त मनोवेधक होतो. भाव्यांचा तुकाराम वीर नानागुणसंपन्न, ध्येयवादी असूनहि त्याच्या जीवनांतील संघर्ष कौतुकाचा विषय होऊं शकतो, जिवाची पकड घेणारा होत नाही.

भावे प्रस्तावनेंत म्हणतात, "नाटकाकडे" एक ललित कृति या दृष्टीनेच मुख्यत: पाहिलें जावें. नाटकांत वादविवाद बऱ्याच ठिकाणीं आहेत आणि ते इतके सारखे आहेत की पुनरुक्तीचा दोष येतो. तुकाराम वीर हा आणखी कुणाचीं मतें बोलून दाखवतो, अशी वाचकांची कल्पना होऊं शकते. कारण त्याच्या व्यक्तित्वाचा विकास कसा झाला, इतर सगळ्यांचे विचार वेगळे, विरोधी असतांना त्याचे विचार एका विशिष्ट प्रकारचे कां झाले, याला नाटकांत आधार मिळत नाही. यामुळे त्याची व्यक्तिरेखा क्षीण राहते. नाटकाची कसोटी रंगभूमीवरच होते, त्या दृष्टीने पहिले दोन तीन अंक गतिहीन कंटाळवाणे वाटतात. परंतु नंतर दोन अंकांत तुकाराम वीराचा समाजाशीं संघर्ष दाखवल्यामुळे त्यांत जीव ओतला गेला आहे. पण या नाटकाला मी जें महत्व देतों तें नाट्यकृतीच्या यशस्वी रचनेबाबत नव्हे. परंतु नाटकांत स्वीकारलेल्या सहिष्णु दृष्टिकोणामुळे. आज सहिष्णु, समंजस दृष्टिकोणाचीच जास्त आवश्यकता आहे. आणि म्हणूनच श्री. भाव्यांच्या या नाटकृतीला महत्व आहे.

—गो. रा. बो.

प्यारी कुरूपता (गद्य-गीत)

—'सुमतिदास'

माझ्या सुंदर शरीराला पाहून लोक माझी स्तुति करतात. माझ्या शुभ–मंगल भावनांची लोक वाहवा करतात. माझ्या कला-गुणांची तरफदारी करतात. माझा ज्याच्याशी संबंध येतो त्याला लोक पवित्र मानतात. आणि जसं जसं असं होतं तसं तसं मला बरं वाटतं. माझी छाती फुलते, मस्तक उन्नत होतं. माझा मान होतो. लोक माझा लोभ करतात, माया मिळते पण...पण वरील. प्रत्येक गोष्ट किती क्षणिक आहे? किती पार्थिव आहे, पृथक् आहे आणि त्यांतच मी रमल्यानं त्या क्षणानंतर मी किती दुःख भोगण्यांत विरून जाईन आणि दोन्हीहि क्षणीं माझं तुझ्यांतील सत्य–शिव–सुंदरतेवरील लक्ष उठेल. जीवानंद सुटेल. सुख विरेल. शक्ति सरेल. नको नको, नकोच मला तें शरिराचं, मनाचं, वाणीचं, संयोगाचं, भावनांचं.....तें असेल नसेल तें आत्मेतर साऱ्या सृष्टीचं सौंदर्यसाम्राज्य नको. मला तुझं लक्ष, तुझी भक्ति, तुझी युक्ति, तुझी शक्ति, तुझीच प्रीति, प्रत्यक्ष तूं...तूंच फक्त अन् प्रत्यक्ष, साक्षात् तूं, तूं, तूंच प्रिय आहेस. तूंच मला हवास. तुझ्या प्रीतीसाठी मला कुरूपता प्रिय आहे. खरंच कुरूपताच प्रिय आहे. प्यारी कुरूपता, प्यारी कुरूपता, दे ती प्यारी कुरूपता ! !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति, नागपूर

परीक्षाफल–ऑगष्ट १९५३

गेल्या २२ ऑगस्ट ५३ रोजीं झालेल्या एकूण सहा परीक्षांपैकी तीन परीक्षांचें फल पुढील प्रमाणे घोषित करण्यांत येत आहे. सर्व परीक्षांना मिळून एकूण १५०० विद्यार्थी बसले. एकूण सव्वीस केंद्रें गेल्या परीक्षेकरिता होतीं.

मराठी प्रवेश

(अ-मराठी भाषीयार्थ प्रथम परीक्षा)

प्रथम श्रेणीः—(गुणानुक्रमें) (१) सुरेंद्रकुमार फुलचंदजी जैन (प्रावीण्य) (भा. भा. मंदिर)
(२) कृपाकर जान
(३) नाना रामचंद्र गुल्हाने
(४) कन्हैयालाल रामकृष्ण मंत्री
(५) नरेंद्रकर जान

द्वितीय श्रेणीः–नानानी मुकुंद दानव, नागो गोविंद घुटे, शंकरवन दूधवन, शेषराव रामभाऊ गुल्हाने, पांडुरंग काशीनाथ गुल्हाने, दत्तात्रेय रुमाले, कु. सुमन चिमणाजी शेंडे, कु. कमल सुरजमल जायले, बिरधीचंद कस्तुरचंद जैन.

तृतीय श्रेणीः—कु. विद्यादेवी जैन, कु. विनोदरानी सत्यदेव, सोमनदास सलामतराय बहिलाणी, शेख हसन शेख नूर, आनंद विठोबा उमरे.

साहित्य स्नातक

(बी. ए. समकक्ष उपाधि परीक्षा)

द्वितीय श्रेणीः–(गुणानुक्रमें) (१) शंकर रामजी तडस
(२) नारायण शेषराव देशपांडे
(३) कु. उषा नारायणराव हरदास
(४) कु. कुसुम विश्वंभरराव देशपांडे
(५) श्रीकृष्ण पुंडलिकराव कठाळे

तृतीय श्रेणीः–विठोबा कृष्णाजी उगेमुगे, बापूराव बालाजी गिरसावळे, पद्माकर द्वारकानाथ गडकरी, कु. पद्मावती गणपतराव गुप्ते, कु. इंदुमति गोपाळराव देशपांडे, कु. प्रमिला दत्तात्रेय दिवेकर, कु. शकुंतला व्यंकटेशराव दिवेकर, कु. सिंधू मुरलीधर कांडगे, श्रीकांत लक्ष्मणराव गिरिपुंजे, बाळकृष्ण रामचंद्रराव पाध्ये, श्रीराम पुंडलिक पिंपळे, सौ. निर्मला बाळकृष्ण महात्मे, बालाजी रामाजी पुट्टेवार, प्रभाकर यशवंत दातार.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य पारंगत

(एम. ए. समकक्ष सर्वोच्च उपाधि परीक्षा)

द्वितीय श्रेणीः–(१) श्री. तुळशीराम नागेश काटकर (चांदा)
(२) सौ. चित्रा हरि वझे (भा. भा. मंदिर, नागपूर)

प्रा. पां. कृ. सावळापूरकर,
संचालक, परीक्षा समिति,
विदर्भ साहित्य संघ.

सूचना

पुढील परीक्षा १६ जानेवारी १९५४ रोजीं होतील. आवेदनपत्रें ५ डिसेंबरच्या आंत स्थानिक केंद्राधिकाऱ्यांकडे सशुल्क भरावींत. साहित्य पारंगत परीक्षेचें आवेदनपत्र श्री. कार्यवाह, परीक्षा समितीकडे १५ आक्टोबर ५३ च्या आंत सशुल्क पाठविलें पाहिजे.

अध्ययन व्यवस्थाः—नागपुरांत अ-मराठी भाषीयांकरिता असलेल्या प्रवेश परीक्षेपासून पदवी परीक्षेपर्यंत सर्व वर्गांची निःशुल्क अध्ययन व्यवस्था दि. १५ सप्टेंबर पासून करण्यांत आली आहे. गरजूंनी माहितीकरिता पत्रव्यवहार करावा.

माणिक के. बैतुले
कार्यवाह, परीक्षा समिति,
विदर्भ साहित्य संघ

पत्ताः–मंडल क्र. ७,
महाल, नागपूर २.

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी
मराठी-भाषा-प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी.

किंमत : सव्वा रुपया

पत्ता : विदर्भ साहित्य संघ; उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

डॉ. वा. ग. शिंगणापूरकर पारितोषिक

विदर्भ साहित्यसंघाच्या 'साहित्यपारंगत' या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यास दरवर्षी पारितोषिक देण्यासाठी डॉ. वासुदेव गणेश शिंगणापूरकर यांनी रु. ५०० वि. सा. संघाला सहृयतेने दिले आहेत. वि. सा. संघ त्यांचा फार आभारी आहे. या रकमेवर जें वार्षिक व्याज येईल तें पारितोषिकाच्या रूपाने देण्यांत येईल.

श्री. श्री. अ. डांगे यांची भेट व भाषण

कम्युनिस्ट पक्षाचे सुप्रसिद्ध पुढारी श्री. श्री. अ. डांगे यांनी दि. ७।९।५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. या प्रसंगीं त्यांचें 'संस्कृत नाटकें' या विषयावर विचारप्रवर्तक भाषण झालें. त्यांनी संस्कृत नाटकासंबंधी नवीन दृष्टिकोन ठेवून, चिकित्सक बुद्धीने भास व कालिदास यांच्या नाटकांचें धावतें समालोचन केलें.

* *

वि. सा. संघ-मंदिरनिधीला देणग्या

१ एप्रिल १९५३ पासून १५ सप्टेंबर १९५३ पर्यंत जमा झालेल्या देणग्या खाली साभार जाहीर करीत आहोंत. त्यानंतर ज्या देणग्या जमा होतील त्याहि पुढे 'युगवाणी'तून जाहीर करण्यांत येतील.

देणगीदाराचें नांव	देणगी रुपये	देणगीदाराचें नांव	देणगी रुपये
श्रीमंत दा. वि. देशमुख	४५००	प्रो. सदाशिव बालाजी वेलेकर	१०१
टिळक पर्स फंडांतून	३०००	श्री. फुलकुमार पोतद्दार	१०१
श्रीमंत केशवराव बुटी	२०००	मोहनी ब्रदर्स c/o द.कृ. मोहनी	१०१
श्रीमंत पी. जी. बुटी	१०००	रा. ब. गणेश हरी गोखले	१००
श्रीमंत भास्करराव बुटी	३००	श्री. नानासाहेब ओगले	१००
टिळक स्टॅच्यू फंड	४५९-१०-०	श्री. बाळासाहेब ढवळे	१००
डॉ. एम. जी. पटवर्धन	२००	श्री. श्यामराव भगवंतराव देशमुख	१०१
न्या. अण्णासाहेब मंगळमूर्ति	१००	सौ. प्रभावतीबाई खरे	१५०
श्री. केशव बाळकृष्ण पळसुले	१०१	श्री. छगनलाल जयदेवप्रसाद भरुका	५१

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देणगीदाराचें नांव	देणगी रुपये
गोंदिया मित्र मंडळ	५१
श्री. त्र्यं. ना. सहस्रबुद्धे	५०
डॉ. हरि नरहर माणके	५१
श्री. वासुदेव गोविंद सोमलवार	५०
श्री. वामन वासुदेव नेने	५१
श्री. माधव दामोदर लोंढे	२५
श्री. नि. घों. लिमये	१०
डॉ. ल. ब. बेलखोडे	१०
श्री. भास्कर गोपाळ रानडे	५
कु. इंदुताई गोडबोले	३
श्री. वि. त्रिं. राजदेरकर	३
श्री. व. शि. गोडसे	१
श्री. शं. रा. मुळे	१

गडकरी स्मारक समिति

श्रीमति बकुळाबाई अभ्यंकर	५००
श्री. त्र्यं. शं. नागले	२५०
डॉ. पी. एन. प्रधान	२००
श्री. जी. बी. बडकस	१०१
श्री. वि. गो. वैद्य	१०१
श्री. आर. बी. चांदुरकर	१०१
डॉ. गोविंद कृष्ण गान	१०१
,, डी. व्ही. प्रधान	५१
श्री. एम. बी. वैद्य	५१
मेसर्स पूना ग्लाऊज एम्पोरियम	२५
श्री. दि. ज. मुळे	२५
श्री. द. ल. देशपांडे	२५

देणगीदाराचें नांव	देणगी रुपये
श्री. पुरुषोत्तम सदाशिव मेने	२५
डॉ. दिनकर मोहनीराम घेरगांवकर	२५
डॉ. हजरनवीस	२५
श्री. एस. एस. पाटणकर	२०
श्री. चन्द्रशेखर सदाशिव बेलेकर	२०
सौ. सुहासिनी वझलवार	२५
श्री. द. ग. दीक्षित	११
सौ. कमलाबाई शिरोळकर	११
श्री. पी. एस. शिरोळकर	११
डॉ. रेवतीराम प्रधान	११
श्री. म. रा. दिघे	११
श्री. जी. वाय. चिटणवीस	११
श्री. म. के. देशपांडे	११
श्री. शा. स. चिने	११
श्री. म. पु. केळकर	१०
सौ. वत्सलाबाई रत्नपारखी	१०
श्री. ल. रा. जोशी	१०
श्री. व्ही. डी. मिराशी	१०
श्री. द. ल. जयवंत	५
श्री. म. स. देशपांडे	५
श्री. मालतीबाई गुप्ते	५
श्री. भय्यालालजी गुप्ता	५
श्री. प्र. रा. जयवंत	५
डॉ. शेणोलीकर	५
श्री. आर. एम. शृंगारपुरे	५
श्रीमती शांताबाई भाटवडेकर	५
डॉ. सौ. घाटे	५

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुमचें प्रकाशन साहित्यप्रेमी वाचकांना
सादर करण्यासाठी

युगवाणींत जाहिराती द्या

लेखक, प्रकाशक व विक्रेते यांनी
आपल्या नवीन प्रकाशनांच्या जाहिराती
युगवाणींत अवश्य द्याव्या.

जाहिरातीच्या दरांसाठी
व्यवस्थापक, युगवाणी,
विदर्भ साहित्य संघ-कार्यालय,
उत्तर अंबाझरी रोड, नागपूर १.

या पत्त्यावर लिहा.

हें मासिक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड नागपूर येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक : पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वार्षिक वर्गणी पांच रुपये : : सभासदांना विनामूल्य : : सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं.च्या वतीनें उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमानें सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपानें अधिक धडाडीनें करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनानें मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटानें चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ